शनिवार । १ मार्च १९८० । ७५ पैसे

माणूस

# दुसरी फाळणी



बहुधा ती सावरकरांची पुण्यातील शेवटचीच जाहीर सभा असावी. वेळ रात्रीची. स्थळ रमणबाग न्यू इंग्लिश स्कूलचे बंदिस्त मैदान. थंडी असल्याने सावरकरांनी गरम कपडे घातलेले होते. त्यांचा तो नेहमीचा तपकिरी रंगाचा कोट. गळ्याभोवती शाल. पायात बूट. गर्द तपकिरी किंवा पूर्ण पांढरा – दोनच रंगांच्या पोशाखात सावरकर जाहीर कार्यक्रमातून त्या काळात तरी वावरत होते. त्या रात्री त्यांची ती सुप्रसिद्ध छत्री काही बरोबर नव्हती. गोल, काळी, उंच टोपी अर्थातच, असायलाच हवी.

‘धर्मांतर हे राष्ट्रांतर’ हे सूत्र त्या सभेत त्यांनी मांडले. वक्तृत्वाच्या ओघात ते सहज येऊन गेले.

: पश्चिमेकडे एक पाकिस्तान झालेच आहे. मी आकांत मांडून तुम्हाला जागे करण्याचा प्रयत्न केला. माझ्या आक्रंदनाने इथल्या पर्वतीच्या काळ्या पत्थरांनादेखील पाझर फुटला असेल. पण तुमची झोप काही उडली नाही. अरे, थोडे जरी डोळे उघडले असतेत तर पाकिस्तान झाले नसते. आता परत सांगतो, पूर्वेकडे लक्ष ठेवा. तिकडे आसामात नवे ख्रिस्तिस्तान निर्माण होण्याचा धोका आहे. धर्मांतराची चळवळ यासाठी तिकडे जोरात सुरू आहे. या धर्मांतरातून फुटीरता वाढीस लागेल आणि पाकिस्तानप्रमाणेच ख्रिस्ती झालेल्यांची स्वतंत्र राज्याची मागणी डोके वर काढील. म्हणून सद्यःस्थितीत धर्मांतर हे राष्ट्रांतर ठरते. दुबळेपणापायी अर्धा बंगाल गमावलात. आता आसामला तरी सांभाळा! ज्यांना केवळ सेवाकार्यच करायचे आहे त्यांनाही मी आवर्जून सांगतो की, काय तुमचे आश्रम वगैरे असतील ते तिकडे आसामात, ख्रिस्तीकरणाचा जेथे जोर आहे त्या भागात उघडा...पुढे या आश्रमांचाही तुम्हाला उपयोग होईल.’

कोणी हा सावरकरांचा इशारा त्या वेळी मनावर घेतला नाही. आसामातील धर्मांतरे वाढतच गेली. यातून नागालँड, मिझोरॅम जन्मास आले. आता या सगळ्यांचे एकत्रीकरण सुरू आहे. भारतापासून फुटून निघण्याच्या मागणीने चांगलेच मूळ धरलेले आहे.

आसाम आज असा कैचित सापडलेला आहे.

एकीकडून बंगला देशातून येणारे – आलेले मुसलमान निर्वासित. यांची एकगठ्ठा मते आजवर काँग्रेसला मिळत राहिल्याने या निर्वासितांच्या लोंढ्यांकडे काँग्रेसने दुर्लक्ष केले. आज गण संग्राम परिषदेने या भागात अभूतपूर्व आंदोलन पेटवल्यामुळे या प्रश्नाकडे सर्व भारताचे निदान लक्ष तरी वेधले गेले. नव्या सरकारचे गृहमंत्री तेथे दोन दिवस तळ ठोकून होते. सर्वसंमत तोडगा अद्याप तरी निघू शकलेला नाही.

दुसरीकडून डोके वर काढत असलेले ख्रिस्तिस्थान. ‘भारतीय’ म्हणजे ‘परका’ असे आजही जेथे मानले जाते

असा सगळा पूर्वेकडचा डोंगराळ भूभाग. हा भूभाग भारताच्या सार्वभौमत्वालाच आज आव्हान देत आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणाचे जाणकार सांगतात, की भारताच्या पश्चिमेकडे पाकिस्तान–अफगाणिस्तान व पूर्वेकडे आसाम–बंगाल या भूभागांची जगातील महासत्तांनी आपापसात वाटणी करूनच घेतलेली आहे. पश्चिमेकडे खैबरपर्यंत रशियाचे स्वामित्व मान्य करण्यात आले आहे. पूर्वेकडे आसाम–बंगाल भागात चीन–अमेरिका यांचे वर्चस्व रशियाला नामंजूर नाही. आसामातल्या ख्रिस्तिस्थानाची पाचर यासाठी अमेरिकेला हवी आहे. यासाठी तेथील धर्मांतराच्या चळवळीला आजवर पाश्चिमात्य राष्ट्रांकडून–विशेषत: अमेरिकेकडून–भरपूर खतपाणी पुरवले गेले. शिवाय चीनला कलकत्ता बंदरापर्यंतची वाट मोकळी नको का? वांशिकदृष्ट्याही चीनचा या मुलखावर दावा आहेच.

भारत ही तिसऱ्या जगातील बलाढ्य शक्ती बनू नये म्हणून जगातील महासत्ता असा आटापीटा करीत आहेत.

यासाठी फाळण्या. एक फाळणी ४७ साली झाली. भारताचा एक हात तुटला. दुसऱ्या फाळणीची तयारी सुरू आहे.

कोण जागे आहे?

## –२६ फेब्रुआरी
## –सावरकरस्मृतिदिन

□

पुणे वार्ता

# घोषबाबूंबरोबर

पांढरे शुभ्र धोतर, वर कोट, कुरळे केस, नाकावर चष्मा ... अगदी खास बंगाली व्यक्तिमत्त्व. बोलण्यातले मार्दव आणि त्याचबरोबरचा ठाम विश्वास. बंगाली मनाचे हे सर्व पैलू गौरकिशोर घोष या बंगाली पत्रकाराच्या व्यक्तिमत्त्वात दिसत होते.

घोषबाबू 'आजकल' या दैनिकाचे संपादक. पत्रकारिता रोमरोमी भिनलेली. या व्यवसायाविषयी अगदी तळमळीनं आणि ठोसपणे बोलणारे घोषबाबू नुकतेच पुण्यात आले होते.

इचलकरंजीच्या फाय फाउंडेशनने श्री. घोष यांच्या पत्रकारितेतील वैशिष्ट्यपूर्ण कामगिरीबद्दल दहा हजार रुपयांचे पारितोषिक देऊन गौरव केला, त्याचसाठी ते महाराष्ट्रात आले होते. यापूर्वीच पु. ल. देशपांडेंनी गौरकिशोरजींची भेट मराठी माणसाला करून दिली होती. त्याव्यक्तिचित्रात त्यांनी रेखाटलेल्या सर्वच पैलूंचं दर्शन इथं घडलं.

पुणे श्रमिक पत्रकार संघानं घोषबाबूंबरोबर एक अनौपचारिक गप्पांचा कार्यक्रम आयोजिला होता. विषय असा नाहीच, त्यामुळे इतर गप्पाटप्पांमध्ये नुकत्याच गाजलेल्या सूर्यग्रहणाचा विषय निघाला. बहुतेकजण किती डोळे निकामी झाले, कितींना काहीच झालं नाही वगैरेचा हिशोब सादर करण्याच्या तयारीत असतानाच गौरकिशोरजींनी ग्रहणाबाबत वृत्तपत्रांनी घेतलेल्या भूमिकेचा 'समाचार' घेतला.

"या खग्रास सूर्यग्रहणाचे मनोहारी आणि दुर्मिळ दृश्य बघण्याच्या आनंदापासून सामान्य जनतेला वंचित करण्यास भारतीय वृत्तपत्रांनी निर्माण केलेली अनाठायी भीतीच कारणीभूत झाली आहे." — घोषबाबूंचा पहिला बाँब.

श्रमिक पत्रकारांनी मग आपला मोर्चा हळूचकन् 'पत्रकाराची सामाजिक बांधिलकी' या खूप बऱ्यापैकी बोलता येणाऱ्या मुद्द्याकडे वळवला. स्वत: घोषबाबू सामाजिक बांधिलकी मानणाऱ्यांपैकी एक आहेत. मघाचाच ग्रहणाचा संदर्भ देऊन ते म्हणाले, "अज्ञात व गूढ गोष्टींच्या भीतीने त्या दिवशी लोक घराबाहेर पडलेच नाहीत आणि वर्तमानपत्रांनी लोकांच्या मनात भीती उत्पन्न करणारे, तज्ज्ञांचे एकतर्फी अहवालच प्रसिद्ध केले. ग्रहणाचं महत्त्व कुणीच मांडलं नाही. ग्रहणकाळात रस्ते निर्मनुष्य होते. देशभर सुतकी अवकळा पसरली होती. ग्रहण बघण्याचा आनंद लुटणे शक्य असूनही फारसं तसं कुणी करत नव्हतं. लोकशिक्षणाच्या कार्यात वृत्तपत्रं अपुरी पडली हाच याचा सरळ अर्थ आहे."

स्वत: घोष 'आजकल' या दैनिकाचे संपादक आहेत. पत्रकारिता हा त्यांच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग; पण आजच्या भारतीय पत्रकारितेत आमूलाग्र बदलाची आवश्यकता असल्याचे सांगताना ते म्हणाले, "कोणत्याही विषयाचा, सामाजिक प्रश्नांचा किंवा घडामोडींचा भविष्याच्या संदर्भात विचार करून त्या दृष्टीने लेखन झाले पाहिजे, त्या दृष्टीने बातम्या दिल्या गेल्या पाहिजेत. ही पत्रकारिता म्हणजे, 'रिपोर्टिंग फॉर टुमारो.' काही वृत्तपत्रांनी या प्रकारच्या जर्नालिझमला


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : चाळीसावा
१ मार्च १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

प्रोत्साहन दिलं आहे; पण ते सर्वच ठिकाणी व्हायला पाहिजे हा बाबूंचा सर्वसमावेशक दृष्टिकोन.

नक्षलवाद्यांचे ' शत्रू नंबर एक ' असलेल्या घोषबाबूंनी आणीबाणी लादल्याच्या निषेधार्थ मुंडन करून घेतले होते. सरकारचा रोष ओढवून घेणारी पत्रे प्रसिद्ध करून तुरुंगावासही भोगला. नक्षलवाद्यांनी त्यांना फाशीची शिक्षा सुनावली होती. त्यावर त्यांनी ' लेट मी हॅव माय से ' हे आत्मनिवेदनपर पुस्तकही लिहिले आहे. घोषबाबूंनी इलेक्ट्रिशियन, शाळामास्तर, नाटककंपनीचे मॅनेजर यासारख्या अनेक नोकऱ्या केल्या आहेत. पत्रकारात वाढत चाललेली ' प्रस्थापितता ' आवडत नाही म्हणून की काय त्यांनी आनंदबझार पत्रिकेतली लठ्ठ पगाराची नोकरीही सोडली.

टॅक्सी मिळाली नाही तर बातमी आणायला कसे जायचे असा प्रश्न आज आम्हा पत्रकारांपुढे उभा राहतो. टॅक्सीशिवाय न फिरणाऱ्या पत्रकारांना सामान्य माणसांनी कितपत आपले मानायचे हा प्रश्नच आहे. आणि सामाजिक बांधिलकी, समाजजागृती अशी उद्दिष्टे ठेवून हस्तीदंती मनोऱ्यात बसू पाहणाऱ्या सध्याच्या व भावी पत्रकारांना गौरकिशोर घोष यांच्या विचारांनी नक्कीच नवी दिशा दाखवली आहे.

—सोमनाथ पाटील

---

# सप्रेम नमस्कार

□ १६ फेब्रुवारीच्या माणूसच्या अंकावरील संपादकीय भाष्याचा नीट उलगडा होत नाही. नारायणपूरचा उपयोग केवळ राजकीय कारणांसाठी करायचा असेल ते खुशाल करोत; पण लेखनाच्या उपहासगर्भशैलीतून असा प्रत्यय येतोय की, बलात्कार होणे आणि ते जगजाहीर होऊन अशा प्रकारच्या घटनांचा धिक्कार होणे किंवा निषेध होणे आणि या लोकमताची काहीएक जरब तयार होणे याला फारसे महत्त्व नाही. किंबहुना अशा प्रकारे बलात्कार झाले तरी चालतील; पण त्याला प्रसिद्धी मिळायला नको; कारण त्यामुळे त्या गावच्या मुलींची लग्नं तरी पार पडतील. बलात्कार घडला असला तरी चालेल; पण निदान अब्रू तरी जायला नको, असे म्हणणे हे अगदी 'जैसे थे' वादी प्रवृत्तीचे द्योतक आहे. आज अनेक बलात्काराचे प्रसंग अब्रू जायला नको या भीतीपोटी दडपले जातात आणि बलात्कार करणारे मोकळे सुटतात. त्यांना जरब बसत नाही. त्यांची दादागिरी पोसली जाते. गंमत वाटतेय लिहिणाऱ्यांची — बलात्कार करणाऱ्यांचा निषेध एका शब्दाने नाही — बलात्काराला प्रसिद्धी देणारे आणि त्याचा स्वतःच्या राजकीय कारणासाठी वापर करणारे फक्त त्यांना दिसतात आणि जाता जाता नेहमीप्रमाणे स्त्रीमुक्तिवाद्यांना टपली मारून जाता येते|– राजकारणासाठी स्त्रीच्या अब्रूचा वापर करणाऱ्यांविरुद्ध निषेध केला नाही म्हणून.

स्त्रियांच्या अब्रूचे माजविले जाणारे देव्हारे आता थांबवायची वेळ आली आहे. बलात्कारामुळे स्त्रिया भ्रष्ट होत नाहीत, त्यांची शरीरे विटाळत नाहीत. हे समजून घ्यायची वेळ आली आहे. अनेक प्रकारचे अपघात होतात. बलात्कार हा अपघात आहे समजा. या पुरुषी वर्चस्व पोसलेल्या, कीड लागलेल्या समाजाकडून घडलेला अपघात, असे लोकांचे शिक्षण करायचीही वेळ आली आहे. अब्रूच्या खोटया कल्पना फेकून देऊन मानवी हक्कांची पायमल्ली करणाऱ्यांविरुद्ध चीड येण्याची, लढण्याची वेळ आली आहे. या लढ्यातच या मुलींना स्वीकारणारे तरुणही भेटू शकतील. नव्या विचारांचे, नव्या दमाचे.

स्त्रीच्या अब्रूचा वापर राजकारणासाठी केला जातोय् हे दाखवून देणारे माणूसकारही ' अब्रू ' या मूल्याचा वापर करून बलात्कारासारख्या पाशवी घटना प्रसिद्धीपासून दूर ठेवून लोकांना अंधारात ठेवू इच्छितात का ?

१५ फेब्रुवारी

**छाया दातार**
मुंबई

[ १ : गुलबर्गा निवडणूक प्रचारसभेत भाषण करताना जॉर्ज फर्नांडिस यांनी सांगितले की, ते स्वतः नारायणपूरला जाऊन आले व तेथे ' बलात्कार ' हा प्रकार घडलेला नाही. मारहाण, लुटालूट झाली. केवळ राजकारणासाठी स्त्रियांच्या अब्रूचा वापर केला गेला... वगैरे.

२ : तरीही बलात्कारासारखे प्रकार घडले असतीलच तर ' माणूस 'च काय, कोणीही त्यांचा निषेधच करील. ( नाझींच्या पाठलागावर असलेल्या रशियन लाल सेनेने युगोस्लाव्हियात प्रवेश केल्यावर तेथील स्त्रियांवर ' बलात्कार ' केले होते. याचा निषेध करण्यासाठी टिटोने मिलोव्हन जिलासला मॉस्कोला स्टॅलिनकडे पाठवले. स्टॅलिनने या बलात्कारांचा निषेध सोडाच, उलट समर्थनच केले. जिलास–टिटो हे दोघेही त्या वेळी ' पक्के ' कम्युनिस्ट असूनही त्यांना स्टॅलिनकृत समर्थनाने धक्काच बसला. (पहा– जिलासचे Conversations with Stalin ) टिटो–जिलास कीड लागलेल्या समाजातच दिसून येणाऱ्या अब्रूच्या खोटया कल्पनांना उगाच बळी पडत होते असे समजायचे का ?

३ : नारायणपूरची घटना कुणीही लपवून ठेवलेली नव्हती. ' प्रतिगामी ' (!) जनता पक्षाने उत्तर प्रदेश विधानसभेत त्याबद्दल योग्य तो आवाज उठवलेलाच होता. संजय गांधींनी पुढे या दुर्दैवी घटनेचा ' राजकीय ' कारणासाठी वापर केला. संपादकीय स्फुटाचा हा मुख्य विषय होता; पण वरील पत्रात छाया दातार म्हणून मोकळ्या होतात की, ' नारायणपूरचा उपयोग केवळ राजकीय कारणांसाठी करायचा असेल' ते खुशाल करोत...' म्हणजे त्यांना संपादकीय स्फुटाच्या मुख्य प्रतिपादनाशी काही कर्तव्यच नाही असे समजावे लागते. ' आर्थिक ' कारणासाठी स्त्रीदेहाचा वापर होऊ नये म्हणून सत्यं शिवं सुंदरम्च्या निर्मात्याचा निषेध करणाऱ्यांनी स्त्रीदेहाच्या अशा ' राजकीय ' वापराबाबत असे ' खुशाल ' राहून कसे चालेल ? का ' डावे ' राजकारण पुढे रेटण्यासाठी अशा घटनांचा वापर झाला तर करून घ्यायचा असे स्त्रीमुक्तिवादिनी मानतात ? मग जमले. संजय गांधी ' उजव्या ' राजकारणासाठी, स्त्रीमुक्तिवादी ' डाव्या ' राजकारणासाठी... ' वापर ' समान... पुरुषी वर्चस्व पोसलेल्या समाजात दुसरे काय होणार म्हणा ! सं. ] □

# इंदिरा-संजय राजवटीचे पहिले पस्तीस दिवस

विजय कुवळेकर

## १७ फेब्रुवारी

रात्रीचे नऊ वाजून गेले आहेत. टेलिप्रिंटरवर नेहमीप्रमाणे बातम्यांचा ओघ चालूच आहे. त्या ओघातच एक बातमी येते, 'केंद्रीय मंत्रिमंडळाची तातडीची बैठक आज रात्री भरत आहे. इतर अनेक प्रश्नांबरोबरच बिगरकाँग्रेस (आय) सरकारं सत्तेवर असलेल्या राज्यांच्या विधानसभा विसर्जित करण्याबद्दलही या बैठकीत विचार होणार असल्याचं कळतं.'

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या मंत्रिमंडळाची ही बैठक आहे. ती रात्री, अनपेक्षितपणे आणि तातडीनं भरते आहे. नेमकी कशासाठी आहे, हे ठाऊक नाही.

पत्रकारांना हे काही नवं नाही. फक्त मध्यंतरीच जनता पक्षाच्या राजवटीत असलं काही नसण्याची वाईट सवय लागली होती. वाढत्या रात्रीतल्या निर्णयप्रक्रियेचा उगाचच विसर पडायला लागला होता.

पण आता असं चालणार नाही ! जागरूक रहायला हवं. कुठल्याही क्षणी एखादी मोठी बातमी धडाडायला लागेल.

काही मिनिटांचा अवधी जातो आणि कुठल्याही तपशिलाशिवाय बातमी येते, 'मंत्रिमंडळाच्या तातडीच्या बैठकीनंतर केंद्रीय गृहमंत्री ग्यानी झैलसिंग यांनी राष्ट्रपतींची भेट घेतली.' म्हणजे निर्णय झालेला दिसतो आहे. काय होणार, या उत्सुकतेनं मी पुढच्या बातम्या पाहतो आहे; पण टेलिप्रिंटर याबाबतीत मूक आहे.

काही मिनिटं अशीच ताणलेल्या प्रतीक्षेत जातात आणि सव्वादहाच्या सुमाराला 'युनायटेड न्यूज ऑफ इंडिया' (यू. एन. आय.) ही वृत्तसंस्था 'फ्लॅश' देते, Nine State assemblies dissolved. पाठोपाठ दुसरा भाग येतो. 'The States are : Uttar Pradesh, Bihar, Tamil Nadu, Rajasthan, Madhya Pradesh, Maharashtra, Punjab, Orissa and Gujarat.'

...आणि मग मात्र 'प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया' (पी टी आय) या वृत्तसंस्थेपेक्षा 'यू एन आय' सतत आघाडी राखते. विधानसभाविसर्जनाची कारणं, पूर्वीचा इतिहास, जनता सरकारनं नऊ बिगर जनता सरकारं असलेल्या विधानसभा एप्रिल १९७७ मध्ये विसर्जित केल्या होत्या ती पार्श्वभूमी असं भरपूर साहित्य धडाधड देण्यात यू एन आय तत्परतेने पुढे राहते. जणू काही आधीच या निर्णयाचा अंदाज घेऊन दूरदृष्टीनं हे सारं साहित्य तयार ठेवलं असावं. केवढी ही तत्परता !

तत्परता आहेच; पण या बातम्यांमध्ये थोडा सूरही वेगळा आहे. नव्या राजवटीशी, नव्या काळाशी सुसंवाद राखणारा हा सूर मला जाणवतो आहे.

या सर्व बातम्यांमध्ये दुसरी एक गोष्ट चटकन् लक्षात येते : इंदिरा गांधींचं नाव फक्त 'इंदिरा गांधी सरकार' एवढं म्हणण्यापुरतंच त्यात आलं आहे. हे लक्षात येताच एकदम एक मागची घटना आठवते, यू एन आयनं १० जानेवारी १९८० ला एक बातमी दिली होती : 'श्री. संजय गांधी यांनी स्मितहास्य करीत सेंट्रल हॉलमध्ये प्रवेश केला तेव्हा त्यांचं भव्य स्वागत करण्यात आलं. खादीचा कुडता-पायजमा हा नेहमीचा वेश त्यांनी परिधान केला होता. त्यावर नारिंगी रंगाची शाल पांघरली होती. बैठकीत ते मागच्या बाजूला बसले होते... बैठक संपताच पत्रकारांनी त्यांना गराडा घातला. त्यांच्या प्रश्नांना उत्तर देताना या तरुण नेत्यानं सांगितलं, 'डिझेल, रॉकेल आणि साखर यांची टंचाई दूर करणं आणि देशातली कायदासुव्यवस्थास्थिती सुधारणं याला मी सर्वाधिक प्राधान्य देणार आहे.'

'आणि तुमच्या पाच कलमी कार्यक्रमाचं काय ?'

'तो मी कधीही सोडून दिलेला नाही.'

'आता तुम्ही तो राबवणार आहात का ?'

'बघू, काय होतं ते.'

१० जानेवारीची ही मुलाखत. तेव्हा इंदिरा गांधींचं मंत्रिमंडळ सत्तारूढ व्हायचं होतं. बाईंपुढे महत्त्वाचे अनेक प्रश्न उभे होते आणि 'बाते कम, काम ज्यादा' हे सूत्र सांगणाऱ्या संजयलाही खूप काम करायचं होतं.

वाढती महागाई, जीवनावश्यक वस्तूंची टंचाई, वाढत्या दंगली आणि अत्याचार आदि गुन्हे, आसाममधलं आंदोलन, अफगाणिस्तानमधल्या पेचामुळं निर्माण झालेली परिस्थिती अशासारखे अनेक बिकट प्रश्न पुढे उभे होते. 'कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचं पहिलं कार्य आमचं सरकार हाती घेईल. भाववाढीचा प्रश्न त्यानंतरच्या प्राधान्याचा आहे,' असं बाईंनी बहुमत मिळाल्यावरच सांगितलं होतं; पण तरीही तो प्रश्न बिकट होताच.

या पार्श्वभूमीवर १४ जानेवारीला बाईंचं मंत्रिमंडळ सत्तेवर आलं. त्यांच्याव्यतिरिक्त चौदा मंत्र्यांचा शपथविधी त्या दिवशी झाला. बाईंच्या नव्या पंतप्रधानपदाची कारकीर्द अधिकृतपणानं त्या दिवशी सुरू झाली.

आणीबाणीनंतरच्या बिकट कालखंडात बाईंना नि संजयला निष्ठेने साथ दिलेल्यांना मंत्रिमंडळात स्थान मिळालं, हे मंत्रिमंडळाच्या यादीवरून स्पष्ट झालं. वृत्तपत्रांनी हेमवतीनंदन बहुगुणा,

सी. एम. स्टीफन, एल. के. झा, डॉ. रफिक झकेरिया, गुलाम नबी आझाद वगैरे अनेकांची नावं संभाव्य मंत्री म्हणून प्रसिद्ध केली होती; पण प्रत्यक्षात त्यातली थोडीच नावं खरी ठरली. यू एन आय चा अंदाज नव्वद टक्के बरोबर ठरला. त्यांनी दिलेली बरीच नावं मंत्रिपदाच्या यादीत दिसून आली.

प्रत्यक्ष उमेदवारांना मात्र कुणाला मंत्रिपद मिळणार आणि कुठली खाती मिळणार याची वसंत साठेंसारख्यांनाही कल्पनाच नव्हती म्हणे. इंदिरा गांधींशिवाय त्यांचे दोन विश्वासू साथीदार यशपाल कपूर आणि आर. के. धवन आणि संजय या तिघांनाच ही यादी माहीत होती. राष्ट्रपतिभवनाकडे यादी पाठवली गेली. तिथल्या खुर्च्यांवर संबंधित नियोजित मंत्र्यांची नावं लिहिली गेली. पण अगदी अखेरच्या क्षणी त्यात काही बदल केले गेले; आधी यादीत नाव नसलेले प्रणवकुमार मुकर्जी ऐन वेळी यादीत आले.

भगवत झा आझाद यांचं यादीत नाव होतं. त्यांना पुरवठा खात्याचं राज्यमंत्रिपद दिलं गेलं होतं. शपथविधीसमारंभासाठी ते राष्ट्रपतिभवनात गेले. पण आपल्याला राज्यमंत्रिपद दिलेलं बघून ते निघून गेले. समारंभाला ते हजर राहिले नाहीत. त्यांना कॅबिनेट मंत्रिपद हवं होतं, असं सांगितलं गेलं; पण खुद्द त्यांनी मात्र कुठलीच प्रतिक्रिया व्यक्त केली नाही. शपथविधी चाललेला असताना आझाद मात्र आपल्या काही सहकाऱ्यांसह आपल्या निवासस्थानी 'विचार-विनिमय' करीत बसले होते.

यादीतल्या इतर नावांबद्दल कुणाला काही विशेष जाणवलं नाही; पण बहुगुणांचं नाव यादीत नाही, हे मात्र सर्वांना विशेषत्वानं जाणवलं. बहुगुणांना काँग्रेस (आय) पक्षात आणण्यात संजयनं मोठा वाटा उचलला होता. आता त्यांना मंत्रिपद मिळणार, अशी सर्वांचीच अपेक्षा होती. पण काल-परवा पक्षात आलेल्या अशा लोकांना मंत्री करायला संजयवादी तरुण खासदारांनीच विरोध केला आणि त्यामुळंच बहुगुणांचं मंत्रिपद गेलं, असं नंतर काही दिवसांनी वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालं. आदल्या दिवशी इंदिरा गांधींनी बहुगुणांना घरी बोलावून घेतलं आणि "तुम्ही पक्षसंघटनेत महत्त्वाची जबाबदारी पार पाडायची आहे", असं त्यांना सांगितलं, असंही प्रसिद्ध झालं. त्याचा कुणी इन्कार केला नाही; पण पुढे काही दिवसांनी बहुगुणांनी स्वतःच एक इन्कार केला. त्यात त्यांनी म्हटलं होतं, "मला उपपंतप्रधानपद नको आहे. कोणत्याही पदाच्या अभिलाषेनं मी काँग्रेस (आय) मध्ये आलेलो नाही. पक्षसंघटनेचं कार्य करण्यातच मला समाधान आहे."

त्यांचा हा इन्कार अनपेक्षित होता. भगवत झा आझादनी मात्र असा कुठलाही इन्कार केला नाही. दोन प्रकारे या दोघांची मंत्रिमंडळातली अनुपस्थिती लक्षात आली. वसंत साठे, पी. व्ही. नरसिंह राव, बी. शंकरानंद वगैरे निष्ठावान मंडळी मंत्रिमंडळात समाविष्ट झाली. त्यांच्या निष्ठेचं बाईंनी आणि संजयनंही स्मरण ठेवलं.

संजयनं आपल्या अशा मित्रांचं विस्मरण होऊ दिलेलं नाही, हे दोन दिवसांपूर्वीच दिसलं होतं. लोकसभा-निवडणुकीत कर्नाटकमध्ये काँग्रेसला दारुण पराभव पत्करावा लागल्याची नैतिक जबाबदारी स्वीकारून मुख्यमंत्री देवराज अरस यांनी ८ जानेवारीला मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर काँग्रेस आणि जनता पक्षातून काँग्रेस (आय)कडे आमदारांची रीघ लागली. विधानसभेत काँग्रेस (आय)चं बहुमत झालं. आपल्याला सतत साथ देत आलेल्या मित्राला संजयनं मुख्यमंत्रिपदी बसवलं. १२ जानेवारीला गुंडूराव मुख्यमंत्री झाले. त्यांच्या तीन सदस्य मंत्रिमंडळात अजून नवी भर पडलेली नाही. तसंच केन्द्रीय मंत्रिमंडळाचा 'लवकरच' होणार असलेला विस्तारही अद्याप झालेला नाही. संरक्षण, उद्योग, पेट्रोल नि रसायन, मजूर अशी महत्त्वाची खाती अद्याप रिकामी आहेत. आणीबाणीपासून संजयचे नम्र मित्र झालेल्या ग्यानी झैलसिंगांना गृहमंत्रिपद मिळालं, याची कायदा-सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर विशेष नोंद घेतली गेली.

## सहकार्य कुठे आहे ?

१४ जानेवारीला रात्री इंदिरा गांधींनी पंतप्रधान या नात्यानं राष्ट्राला उद्देशून आकाशवाणीवरून भाषण केलं. जनता पक्ष सरकारनं देशाची अर्थव्यवस्था खिळखिळी केली आहे, कायदा सुव्यवस्था स्थिती बिघडलेली आहे, असे आरोप त्यांनी केले. आपल्या सरकारबद्दल बोलताना त्यांनी सांगितलं, "सर्वजनहिताय सर्वजनसुखाय हे आमच्या सरकारचं उद्दिष्ट आहे. ते साध्य करण्यासाठी आम्ही संघर्षाऐवजी सहकार्याचा मार्ग स्वीकारू. विरोधकांबाबत आम्ही सूडबुद्धीने वागणार नाही, अशी मी ग्वाही देते. देशापुढील आर्थिक आणि इतर समस्या सोडविण्यासाठी सर्वांनी सरकारला सहकार्य द्यावं, असं मी आवाहन करते."

पंतप्रधानांच्या भाषणात सरकारच्या भावी कार्यक्रमांची दिशा दिसेल, अशी अपेक्षा होती; पण त्याबाबतीत निराशा झाली. सूडबुद्धीनं न वागण्याचं आश्वासन आणि जनता, लोकदल सरकारावरची टीका एवढंच या भाषणाचं सार होतं. प्रचंड बहुमताच्या बळावर सत्ता उभी असताना बाईंनी दिलेलं हे आश्वासनही महत्त्वाचं होतं; पण संजयनं मात्र असं कुठलंच आश्वासन कुणालाही दिलेलं नाही. या ना त्या कारणासाठी त्याला भेटणाऱ्यांना तो याची जाणीव करून देत असतो, असं सांगितलं जातं. खरं-खोटं देव जाणे !

पंतप्रधानानंतर विरोधी पक्षीय नेत्याला आकाशवाणीवर भाषणाची संधी द्यायची प्रथा जनता सरकारनं सुरू केली होती. नव्या राजवटीनं या प्रथेचं पालन केलं नाही. म्हणून पंतप्रधानांच्या भाषणाप्रमाणेच या प्रथाभंगावरही विरोधी पक्षांनी टीकेची झोड उठवली; पण गृहमंत्री ग्यानी झैलसिंग आणि माहिती व आकाशवाणीमंत्री वसंत साठे यांनी त्यांच्या टीकेला उत्तर दिलं. "मान्यताप्राप्त विरोधी पक्षच नसल्यामुळे अधिकृत विरोधी पक्षनेता कोणीही नाही. मग भाषणाची संधी कुणाला द्यायची ?", असा सवाल त्यांनी केला. निवडणुकीत दारुण पडझड झालेल्या विरोधी पक्षांजवळ या सवालाला उत्तर नव्हतं. सर्वात मोठ्या विरोधी पक्षाच्या नेत्याला ही संधी द्यायची मागणी विरोधकांनी केली; पण सरकारनं ती मात्र मान्य केली नाही. त्यामुळं विरोधकांना आकाशवाणीवरच्या भाषणाची संधी मिळाली नाही. "लोकशाही रक्षणासाठी आम्ही डोळ्यात तेल घालून लक्ष देऊ", असं आश्वासन विरोधी पक्ष जनतेला देत राहिले आणि "भूतकाळ विसरून नवं सहकार्याचं वातावरण निर्माण

पृष्ठ २३ वर

दि. बा. मोकाशी

# गृहिणींनो, दूध का नासते ?

भोर दुग्ध विकास प्रकल्पाचे अधिकारी श्री. मनुभाई पटेल यांनी जोरदार तक्रार केली की, आपल्या गृहिणी दिवसातून फार वेळा दूध उकळीत ठेवतात. जरा चुलीला व हाताला सवड झाली की, त्यांचे दुधाचे पातेले चुलीवर येऊन उकळत राहते.

आजचे संध्याकाळचे पुणे कात्रजच्या या दूधडेअरीत घालवायचे मी ठरविले होते. दूध हा विषयही सर्वांच्या जिव्हाळ्याचा. पुण्याला दूधपुरवठा अनेक मार्गांनी होतो. बाहेरून गवळी टांग्यांतून किंवा सायकलवरून दूध आणतात. खुद्द शहरात पाचपन्नास म्हशी ठेवून दूधपुरवठा करणाऱ्या डेअऱ्या आहेत; पण या सर्वांत फार मोठ्या प्रमाणात दोन दूधप्रकल्प पुण्याला दुधाचा पुरवठा करतात. एक मुंबई-पुणे रस्त्यावरील महाराष्ट्र सरकारचा प्रकल्प व दुसरा कात्रजचा. याशिवाय सांगली वगैरे भागातून दूध येते; पण ते फार नाही.

श्री. पटेल म्हणाले, ' महाराष्ट्रात सहकारी सोसायट्यांच्या मार्फत रोज साधारण पंधरा लाख लिटर दूध गोळा केले जाते. ते दूध सरकार घेते. त्यातील साडेनऊ लाख लिटर मुंबईत लागते. दोन लाख लिटर दूध पुणे, नागपूर, नाशिक इथे खपते. उरलेल्या तीनसाडेतीन लाख लिटरचे, सरकार पावडर व लोणी करून घेते. त्या पावडरचेच पुढे उन्हाळ्यात दूध कमी पडते तेव्हा पाणी घालून दूध करून देतात. पावडरचे दूध लोकांना कमी प्रतीचे वाटते व लोक नाके मुरडतात; पण रोजच्या व पावडरच्या दुधात काही फरक नसतो. पावडरचे दूध शुद्ध दूध असते. दुधाची पावडर करण्याच्या युक्तीमुळे उलट उन्हाळ्यात दुधाचा ओरडा होतो तो होत नाही व भावही तेवढे चढत नाहीत. '

ते म्हणाले, ' पुणे-वेस्टर्न घाट हा डोंगराळ भाग आहे. तेथे पावसाळ्यात भरपूर गवत उगवते व चारा असल्याने दूधही खूप येते. तेच उन्हाळ्यात या भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई होते. मग म्हशींसाठी पाणी कुठले व चारा कुठला ! त्यामुळे या भागातल्या शेतकऱ्यांना म्हशींची निगाही ठेवता येत नाही. त्यांच्याजवळ म्हशींना सकस खायला घालायलाही काही नसते. पूर्वेच्या भागात मात्र दूध उत्पादन चांगले आहे. जळगाव-धुळे विभागात रोज दोनअडीच लाख लिटर दूध गोळा होते. कोल्हापूर भागात एकदीड लाख लिटर व मिरज-सांगली भागातून एकसव्वा लाख लिटर दूध येते. '

¤

मनुभाईंचे संपूर्ण नाव मनुभाई नरोत्तमभाई पटेल असे आहे. त्यांचे मूळ गाव गुजरातेत आनंदपासून तीस किलोमीटरवर डाकोर थासरा हे आहे. आनंद शेतकी महाविद्यालयातून ते पदवीधर झाले. ते डेअरी टेक्नॉलॉजिस्ट झाले. अमूल डेअरीत दोन वर्षे ट्रेनिंग ऑफिसर म्हणून काम केले. डेअरीचे पुढील शिक्षण घेण्यासाठी पाच-सहा जणांची निवड झाली त्यात त्यांची निवड होऊन ते सात वर्षे जर्मनीत राहिले. जर्मन भाषा शिकून त्यांनी कील युनिव्हर्सिटीत एम. डी. पी. कोर्स केला. जर्मनीतील सर्वांत मोठी डेअरी तिथे आहे. त्या डेअरीतून रोज अठरा लाख लिटर दूध बाहेर पडते भारतात डेअरी काढण्यास वेस्ट जर्मन को. आप. कन्झ्युमर्स काँग्रेसने सतरा लाख रुपयांची देणगी दिली. ही देणगी ज्या आंतरराष्ट्रीय सहकारी संस्थेतर्फे मिळाली, त्यांच्याच तर्फे श्री. पटेल यांना इथे धाडण्यात आले. ते म्हणाले,

' इथे डेअरी चालू करून देण्याचे काम मी घेतले. मी इथे आलो तेव्हा इरेक्शनला सुरुवातही झाली नव्हती. इरेक्शनला दोन वर्षे लागली. पूर्वी महाराष्ट्र स्टेट को. ऑप. मिल्क फेडरेशन होते. त्यांनी हा प्रोजेक्ट उभा केला. पुणे डिस्ट्रिक्ट कोऑपरेटिव्ह फेडरेशनला ट्रॅन्स्फर केला. फेडरेशनचे डायरेक्टर बोर्ड आहे. त्याचे अध्यक्ष श्री. अशोकराव मोहोळ आहेत. प्रत्येक जिल्ह्यात एक फेडरेशन आहे. त्यासाठी तालुक्यातून सभासद निवडतात. दुधाच्या प्रमाणात म्हणजे पाच हजार लिटर दुधामागे एक डायरेक्टर घेण्यात येतो. प्रत्येक जागी दूधउत्पादक को. ऑप. सोसायटी असते. सोसायटी आपल्या सभासदांकडून दूध घेते. कॅन व बर्फ आम्ही पुरवतो व ठरलेल्या सेंटर्सना आमची गाडी जाते. आतापर्यंत आम्ही शेतकऱ्यांस कर्ज देत होतो. फेडरेशन हमी घेत असे; पण गेल्या वर्षी फेडरेशनला अडीच लाख भरावे लागले. तेव्हा हमी घ्यावयाची नाही असे फेडरेशनने ठरविले होते. आम्ही महाराष्ट्र बँकेचे चौतीस लाख लोन घेतले होते. त्याचे व्याज सव्वीस लाख झाले; पण ती साठ लाखाची सर्व रक्कम फेडली. आता डेअरी कर्जमुक्त आहे.'

¤

आपल्याकडे दुधाचे महत्व अपरंपार आहे,

पंचामृतापासून चहापर्यंत. वेदकालापासून आजतागायत दुधाचे महत्त्व कमी झाले नाही. गोपालकृष्ण तर सर्वांचा लाडका आहे. पंढरपुरात गोपाळकाल्याला एक दिवस दिला आहे. हंडी फोडण्यासाठी अजून मुलांच्या खांद्यांवर मुले चढतात. मुलांना रोज दूध द्यावे. तालीम करणाऱ्यांचे दूध पिणे सर्वश्रुत आहे. रात्री निजताना दूध पिणे आरोग्यकारक धरले आहे. दुधाचे हे वाढते महत्त्व कदाचित दूध पुरेसे नसल्यानेही असेल. पण गोरसाची महती वर्षानुवर्षे ऐकत असता एकदाच मला धक्का बसला. एका प्रकाशकाने सांगितले की, त्याच्याकडे एक हस्तलिखित बाड आले आहे; पण चांगले लिहिलेले असूनही त्याचे काय करावे कळत नाही. कारण त्या बाडाला नाव आहे– 'दूध हे विष आहे' आणि हस्तलिखिताची असतील ती अडीचशे एक पाने. दूध हे आरोग्यास कसे घातक आहे व वेदकालात दुसरा काही पदार्थ नसल्यानेच त्याला महत्त्व लाभले. आज दुसरे इतके पदार्थ आहेत की, हे शरीर पोखरणारे विष घेण्याची मुळीच आवश्यकता नाही, वगैरे मतांचे उत्तम साधार प्रतिपादन होते. अर्थात प्रतिपादन किती उत्तम असले तरी ते वाचणार कोण व पटणार कुणाला ? प्रकाशकाने अर्थातच ते बाड परत केले.

¤

आपल्याकडे दूध वाढीसाठी चाललेले यत्न व हॉलंड, डेन्मार्क, स्वीडन, नॉर्वे वगैरे देशांत दूध न वाढावे म्हणून चाललेले प्रयत्न ही दोन चित्रे पाहून गम्मतच वाटेल. श्री. पटेल म्हणाले, 'पश्चिम जर्मनीत कुणी एक गाय कमी केली की चांगले काम केले म्हणून आठ हजार रुपये सबसिडी मिळते. दुधाचे भाव उतरू नयेत म्हणून तेथे दूध समुद्रात ओततात. तिथे एक गाय तीसचाळीस तर एखादी पन्नास लिटरही दूध देते.' डेन्मार्क किंवा स्वीडनहून निघणाऱ्या एका मासिकात मी तेथील विपुल दुग्धउत्पादनात्रा केवढा प्रश्न उपस्थित झालाय याचे चित्र मांडलेला लेख वाचला होता. जास्तीत जास्त दूध देणाऱ्या गाईंचे उत्पादन करता करता आता या दुधाचे काय करावयाचे हा तेथील शेतकऱ्यांना प्रश्न आहे. दुधाची पावडर, चीज वगैरे सर्व करून उवे व दूधही शिल्लक राहते अशी स्थिती आहे. दूधउत्पादनासाठी गाईंना द्यावयाच्या खुराकाची किंमत दुधाला भाव नसल्याने परवडत नाही. दूध उत्पादन करणाऱ्या देशात इतरांना दूध पुरवण्याची चढाओढ आहे.

त्या मासिकांतील माहितीत तेथील एका शहरातील चौकात उभ्या केलेल्या गाईच्या पुतळ्याचा फोटो होता. मला ती कल्पना आवडली. आपण गाय पवित्र मानतो. कृष्णाच्या मूर्तीजवळ ती उभी असते वगैरे ठीकच. पण गाईचा स्वतंत्र पुतळा उभा करावासा वाटण्याइतके दूधउत्पादन आपकडे होवो.

तिकडील आणखी माहिती देत असता मनुभाई पटेल म्हणाले, 'आपल्याकडील डेअरीतून बाहेर पडणाऱ्या दुधाचा भाव जगात हाय्येस्ट आहे. त्याचे कारण आहे. डेअरीतील यंत्रसामुग्री दोन्हीकडे तीच आहे असे धरून इकडील व तिकडील डेअरीत एक मोठा फरक आहे. जर्मनीत रोज अठरा लाख लिटर दूध भरणाऱ्या डेअरीत दोनशे साठ लोक कामाला लागतात. याउलट आपली परिस्थिती पहा. अमुक डेअरीत रोज पाच लाख लिटर दूध भरले जाते तिथे दोन ते अडीच हजार माणसे कामाला आहेत. पुण्यात वीस हजार लिटर दूध भरले जाते तिथे नव्वद लोक कामाला आहेत ! आपल्याकडे प्रमाणाबाहेर माणसे लागतात याचे कारण सिस्टीम रॉंग आहे. इथे एका माणसावर नजर ठेवण्यास एक माणूस लागतो. जर्मनीत काम करणारे व वर एकदम मॅनेजिंग डायरेक्टर असतो. इथे मॅनेजिंग डायरेक्टरपर्यंत बारा अधिकाऱ्यांची शिडी असते. जगात आपले इंडियन फार हुषार धरले जातात. त्याचा अभिमान वाटतो. चढाओढीत ते हार जात नाहीत; पण या सिस्टीममुळे सर्व वाया जाते. जर्मनीमध्ये एका माणसाने चूक केली तर तो ती मान्य करतो, क्षमा मागतो व कामाला लागतो किंवा बाजूला होतो. आपल्या इकडे मेमोचा कारभार. कामे रेंगाळत ठेवली जातात. तिथे विश्वास ठेवून काम सोपवले जाते व एकदा काम सोपवले की, कुणी मध्ये येत नाही. माणसाकडून काम होण्याची अपेक्षा असते. ते जर झाले नाही तर दयामया नसते. आपल्याकडे लांगूलचालन, वशिल्यानं निकामी माणसं चिकटून ठेवणं हेच प्रकार फार. त्यामुळं काम करणारी माणसंही काम करीत नाहीत. आमच्याकडे गुजरातेत आनंद डेअरीत चेअरमन निवडून दिला की संपलं. त्याच्यावर संपूर्ण विश्वास ! तिथे एक चेअरमन जास्त दिवस असतो. राजकारणातले लोक डेअरीच्या कामकाजात पडत नाहीत. महाराष्ट्रात तसे नाही. संस्थांच्या कामकाजात राजकारण्यांचा हस्तक्षेप इथे फार!

'जर्मनीमध्ये साधा कामगारसुद्धा देशप्रेरित असतो. एकदा तिथे दुधाची पावडर पिशवीत भरीत असता एका पिशवीत दोष राहिला. तोंड नीट बंद झाले नाही असे काही तरी झाले. आमच्यापैकी कुणी तरी ती पिशवी तशीच पुढे जाऊ दिली. तेव्हा तिथला कामगार म्हणाला, 'असं चालायचं नाही ! जर ही उघडी पिशवी सैनिकांना पुरवली गेली आणि उघड्या राहिलेल्या पावडरीमुळं त्याला विषबाधा झाली तर तो रशियनाशी कसा लढेल ?' साध्या साध्या गोष्टीपासून ते देशाची काळजी करतात !'

आपल्या गुजरातमधील माहिती देत ते म्हणाले, 'गुजरातमधे म्हशीच आहेत. गाई नाहीत. आनंदमध्ये, मुख्य उद्योग शेतीचा आहे. गवताचं, पेंढे–कडबा यांचं काय करायचं म्हणून प्रत्येक शेतकरीकुटुंब एक दोन म्हशी ठेवतं. दुधाचा उद्योग निघाल्यावर शेतकरी-गृहिणी म्हशीचं उरलेलं दूध डेरीत घालू लागल्या. तिकडे म्हशींचे काम स्त्रियाच करतात. तेव्हा या दुधाचे आलेले पैसे हे गृहिणीच्या मडक्यात जातात. मग ती या पैशाचं नातवंडं किंवा इतरांसाठी हौसेनं काही करते. पुरुषांचा या पैशावर हक्क नसतो. खेडा जिल्ह्यात पाणी खूप, गवत खूप, सपाट जमीन, दोन पिकं यामुळं नव्वद टक्के शेतकऱ्यास दुधात इंटरेस्ट नसतो. म्हैसाणात तेच. उलट इथे हा पुरुषाचा उद्योग आहे. इतर विशेष उत्पन्न नसल्यानं त्यावर भर द्यावा लागतो. म्हणून अटीतटी जास्त असते.

¤

कात्रजच्या डेअरीची जागा श्री. मदाने यांनी निवडली. पुण्याहून कात्रजच्या वाटेवर अलीकडे उजव्या हातास जरा उंचावर डेअरीची इमारत आहे. जागा निवडल्यावर हा प्रकल्प कोण करणार हा प्रश्न आला. तेव्हा रघुनाथराव पाटील त्यांना भेटले. त्यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी संघ काढला व प्रोजेक्ट पुण्यात उभारावयाचे ठरविले. जर्मनीने सहा लाख रुपये देणगी दिली. जास्त

दूध आले तर लोणी करण्याचे यंत्र बसवृण्यास जर्मनीने साडेतेरा लाख दिले. सहकारी संघात जिल्ह्यानिहाय एकेक डायरेक्टर घेतला. सुरुवातीला खाजगी धंदेवाल्यांकडून दूध घेऊन काम सुरू केले.

श्री. पटेल यांनी डेअरीचे काम दाखविले. खेड्यापाड्यांतून कॅनमधून गोळा करून आणलेले दूध एका हौदात ओततात. तेथून निर्जंतुकरणासाठी ते नळ्यातून जाते. निर्जंतुकरणासाठी दूध ७२° ते ७५° सें. गरम करून एकदम ४° पर्यंत उतरवतात व याच तपमानात ते सतत ठेवले जाते. बाटल्यांतले व पिशवीतले दूध आपल्याकडे येईपर्यंत दहा डीग्री तपमान होते. दुधात दुसरी पावडर वगैरे मिसळली जाते हे खोटे. फॅटसाठी, दुधात अशुद्ध द्रव्ये आहेत का हे बघण्यास ते तपासले जाते व गाळले जाते. बाटल्या किंवा पिशव्या भरण्याचे काम यंत्राने होते. दूध हौदात ओतताना दुधाला हातांचा स्पर्श होतो तेवढाच. नंतर सर्व काम यंत्रे करतात.

मेहता म्हणाले, 'दुधाच्या बाटल्यांतून उंदीर, झुरळे सापडतात अशी तक्रार लोक करतात. पण तुम्हीच इथे बाटल्या किती काळजीपूर्वक धुतल्या जातात ते पहा. त्या वेळीसुद्धा माणसाचे हात बाटल्यांना लागत नाहीत. केमिकलसने बाटली धुऊन, स्वच्छ करून, वाळवून, उपडी होऊन बाहेर येते. यात झुरळ काय पण मुंगीसुद्धा येण्याचा संभव नाही!'

गृहिणी दूध फार उकळतात ही तक्रार त्यांनी केलीच होती. ते म्हणाले की, 'दुधाची बाटली सकाळी सहा-सात वाजता घरी येते. दहापर्यंत ते तसेच वापरण्यास हरकत नाही. मग मात्र एकदा तापवावे. तेसुद्धा सत्तर डीग्री. उकळण्याची जरूर नाही. त्यानंतर पुन्हा संध्याकाळी सात-आठला ते तसेच तापवावे. आपण दूध फार वेळा उकळतो. उकळल्याने त्यातील व्हिटॅमिन नष्ट होतात. तसेच जितके वेळा उकळतो तितक्या वेळा प्रोटीन तळाशी चिकटतात (खरवड) व दुधात प्रोटीन रहात नाहीत. असे निःसत्त्व दूध पिऊन काय लाभ? अॅल्युमिनियम किंवा स्टीलचे भांडे दुधास घेताना आधी थोडे पाणी घालून ते उकळावे. मग थोडे पाणी शिल्लक ठेवून, तापवण्याचे दूध त्यात ओतावे. त्यामुळे दूध जळत नाही. स्टेनलेस पातेल्यात तळातले दूध एकदम फार गरम होते व वरचे थंड राहते. त्यामुळे दूध फाटते. पितळी किंवा तांब्याचे भांडे असेल तर ते फार स्वच्छ हवे. कुठेही हिरवे ठिपके नकोत. त्या भांड्यांना चांगली कल्हई हवी. गवळ्यांनीसुद्धा ही काळजी घ्यायला हवी. जनावराचे सड नीट धुऊनच दूध काढावे. आपले स्वतःचे हात कपडे व दूध काढावयाचे भांडे स्वच्छ असावे, दुधाचे भांडे उचलताना, ठेवताना गृहिणींनीही काळजी घेतली पाहिजे. खरकट्या पकडीने दूध उचलू नये. दुधाचे भांडे फोडणी वगैरे उडेल असे ठेवू नये. तसेच बोटे बुडवून, आपण किंवा मुलांनीही दूध ओतून घेऊ नये.'

आम्ही सारी यंत्रे पाहून परत मेहतांच्या खोलीकडे येत असता मेहता म्हणाले, 'दूध कॅनमधून हौदात ओतून घेत असतानाच दुधाच्या वासावरून दूध खराब झाले आहे का हे ओतून घेणारा ओळखतो. त्यांची नाके इतकी तरबेज झालेली आहेत. लगेच ते दूध वेगळे काढून क्रीमसाठी नेले जाते.' बोलत बोलत आम्ही ऑफिसमध्ये येऊन बसलो. ऑफिसात रघुनाथराव पाटील यांचा संस्थापक म्हणून फोटो लावलेला आहे. तसेच मामासाहेब मोहोळ यांचाही अमृतमहोत्सवानिमित्त लावलेला फोटो आहे. या अमृतमहोत्सवाचे अध्यक्ष महाराष्ट्र बँकेचे डॉ. वसंत पटवर्धन होते व हा उत्सव दि. ५-२-७९ ला झाला, असे खाली लिहिले होते.

नेस कॉफी घातलेल्या गार दुधाच्या पेल्याने संध्याकाळ साजरी करून आम्ही परतलो. □

# लोकशाहीवाद्यांपुढील आव्हान

वा. दा. रानडे

लोकसभा निवडणुकीतील पराभवानंतर आता सर्व लोकशाहीवाद्यांपुढे प्रश्न आहे तो लोकशाहीवादी शक्तींची पुनर्बांधणी करण्याचा. कोणताही एक पक्ष इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील हुकुमशाही प्रवृत्तीच्या शक्तीशी मुकाबला करण्यास समर्थ नाही हे पुनः एकदा स्पष्ट झाले आहे. वास्तविक काँग्रेस पक्षाच्या तीस वर्षांच्या मक्तेदारी राजवटीतच हे स्पष्ट झालेलं होतं. पण १९७७ साली सत्ता हाती आल्यावर जनता पक्षातल्या काहींना याचा विसर पडला. आपसात भांडून जनता पक्ष फोडून त्यांनी आपल्याच कर्माने इंदिरा गांधींना सत्तेवर येण्याची संधी दिली. गणित साधे आहे. इंदिरा काँग्रेसला फक्त ४२ टक्के मते मिळाली. लोकदल आणि जनता यांची एकत्रित मते ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहेत. बिहार व उत्तर प्रदेशात तीच परिस्थिती आहे. विधान सभा निवडणुकात हे दोन पक्ष आणि डावे गट यांची एक आघाडी केली तर इंदिरा काँग्रेसला दोन राज्यातील सत्तेपासून ते दूर ठेवू शकतील. दोन्ही पक्षातील काही नेते या दृष्टीने प्रयत्न करीत आहेत, पण काही नेते जुने हेवेदावे विसरायला तयार नाहीत. निवडणुकीपुरता जागा वाटपाचा समझोता, व्यापक समान कार्यक्रमावर संयुक्त आघाडी, की एक पक्ष हे तीन पर्याय विरोधी पक्षापुढे आहेत. त्यातून कोणत्या पर्यायाची निवड आजच्या परिस्थितीत योग्य याचा विचार करायला हवा. निवडणुकीपुरता समझोता पुरेसा नाही. त्यातून प्रभावी विरोधी शक्ती निर्माण होत नाही. जनता पक्षाच्या

रूपाने विरोधी पक्षांचा एकच पक्ष स्थापण्याचा प्रयोग १९७७ च्या निवडणुकांच्या वेळी जयप्रकाश नारायण यांच्या प्रेरणेने करण्यात आला. काँग्रेसला प्रभावी पर्याय निर्माण करणे हा त्या मागे उद्देश होता. पण आणीबाणीतील अतिरेकी आणि लोकशाहीच्या गळचेपीबद्दल जनतेत एवढा असंतोष होता की, तिने काँग्रेसची सत्तेची मक्तेदारी संपवून जनता पक्षाला सत्तेवर आणले. जनता पक्षातील एकजूट टिकली असती तर तो पाच वर्षे सत्तेवर निश्चित राहू शकला असता. पण प्रथम पासूनच घटक वादाने या पक्षाला पछाडले आणि त्याचे पर्यवसान पक्ष फुटण्यात आणि सत्ता गमावण्यात झाले.

भिन्न धोरणे, विचारप्रणाली असलेल्या पक्षांनी एकच पक्ष स्थापण्याचा हा प्रयोग मूलतःच चुकीचा होता का ? कल्पना चुकीची होती असे म्हणता येणार नाही. पण असा पक्ष यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेला व्यापक दृष्टिकोन सर्वच घटक पक्षांच्या नेत्यांजवळ नव्हता आणि त्यात जनतेने त्यांना एकदम सत्तेवर नेऊन बसविल्याने सत्तेबरोबर येणारी स्पर्धा व ह्या अनिष्ट प्रवृत्ती आल्या. काही नेत्यांना पक्षापेक्षा स्वतःच्या वैयक्तिक आकांक्षा महत्त्वाच्या वाटल्या व त्यांनी पक्ष फोडला आणि या पक्ष फोडचांचे शिरोमणी चरणसिंगच. आता आघाडी पेक्षा एक पक्षच हवा असे पुनः म्हणत आहेत याला काय म्हणावे ? याच चरणसिंगांनी पूर्वी जनता पक्ष आता एक पक्ष राहिलेला असून तो एक आघाडी आहे हे मान्य करून प्रत्येक घटकाने स्वतंत्रपणे काम करावे असे सुचविले होते. याचा त्यांना विसर पडला काय ? चरणसिंग एका भूमिकेवर कधीच ठाम राहिलेले नसून स्वतःचे नेतृत्व टिकविण्यास सोयीच्या अशा भूमिका ते नेहमी घेत आलेले आहेत. त्यांना एक पक्ष म्हणजे लोकदलच हवे असून त्यात इतर पक्षांना विलीन व्हावे आणि चरणसिंगांचे नेतृत्व मान्य करावे अशी त्यांची अपेक्षा आहे. जगजीवनरामांच्या गटाचा निर्णय हा लेख लिहीपर्यंत आलेला नव्हता पण निवडणुकीतील पराभवाचे खापर जनसंघावर फोडून ते बाहेर पडण्याच्या विचारात आहेत. अशा परिस्थितीत एकच प्रभावी विरोधी पक्ष स्थापन होण्याची शक्यता फार थोडी दिसत आहे.

तेव्हा उरतो एकच पर्याय तो म्हणजे संयुक्त आघाडीचा. जनता, लोकदल, दोन्ही कम्युनिस्ट पक्ष, इतर डावे गट, रिपब्लिकन यांनी एकत्र येऊन संयुक्त आघाडी उभारणे हाच सध्याच्या परिस्थितीत इंदिरा गांधींच्या हुकूमशाही प्रवृत्तींविरुद्ध लढण्याचा मार्ग आहे. जनता पक्ष ज्यांनी फोडला त्यांच्याशीच पुन्हा सहकार्य करावयाचे हा विचार जनता पक्षाच्या काही नेत्यांना व कार्यकर्त्यांना अस्वस्थ करीत आहे व ते स्वाभाविक आहे. लोकदलालाही जनता पक्षाचे सहकार्य हवे आहे; पण पक्ष फोडण्यात आपले काही चुकले याबद्दल पश्चात्तापाचा एक शब्द त्यांच्या नेत्यांपैकी कोणी काढलेला नाही. १९७७ च्या काँग्रेस पराभवाचे प्रामाणिक आत्मपरीक्षण इंदिरा गांधींनी केले नाही अशी टीका जनता पक्षाच्या काही नेत्यांनी त्या वेळी केली होती; पण १९८० च्या निवडणुकीतील आपल्या पराभवाचे कठोर आत्मपरीक्षण करण्याची जनता व लोकदल नेत्यांची तरी कोठे तयारी आहे ? पक्षातील फूट हे तर पराभवाचे एक कारण आहेच; पण तेवढेच कारण नाही. जनता सरकारचा नाकर्तेपणा हे त्यापेक्षाही मोठे कारण आहे. नाकर्तेपणाचे कारण घटकवाद आणि आपसातील भांडणे. ती निस्तरण्यातच नेत्यांचा सारा वेळ व शक्ती खर्च होत होती आणि सरकार जाग्यावर आहे की नाही असेच जनतेला वाटू लागले होते.

आपल्या चुकांपासून धडा घेऊन प्रभावी विरोधी आघाडीची उभारणी करण्याच्या प्रयत्नास आता लागले पाहिजे. जनता, लोकदल, डावे गट व रिपब्लिकन यांची संयुक्त आघाडी उभी राहिली तर सध्याच्या परिस्थितीत तो प्रभावी पर्याय निश्चित होऊ शकेल. महाराष्ट्रात पुलोद आघाडी पुन्हा उभारायला हवी. जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांची एक बैठक मुंबईत झाली. पुलोदमध्ये सहभागी होण्याचे जनता पक्षाचे नुकसानच झाले तेव्हा स्वतःच्या बळावरच निवडणुका लढवाव्या असा बहुसंख्य कार्यकर्त्यांचा सूर दिसून आल्याचे महाराष्ट्र जनता पक्षाचे अध्यक्ष बबनराव ढाकणे यांनी बैठकीनंतर सांगितले. बैठकीचा त्यांनी सांगितलेला निष्कर्ष बरोबर नाही असे पत्रक नंतर काही नेत्यांनी काढले. काही दिवसांपूर्वी भरलेल्या काँग्रेस मेळाव्यातही जनता पक्षाशी संबंधांचा फेरविचार करायला हवा असे मत काही कार्यकर्त्यांनी व्यक्त केले होते. एकमेकांच्या सहकार्याशिवाय इंदिरा काँग्रेसशी आपण परिणामकारक सामना देऊ शकत नाही हा अनुभव लोकसभा निवडणुकीत आला असताना सुद्धा आपसातच लढणार असू तर या निवडणुकीपासून आम्ही काहीच धडा शिकलो नाही असे म्हणावे लागेल.

विरोधी पक्षांची आघाडी केवळ निवडणुकीपुरती नव्हे तर अन्यायाविरुद्ध जनतेचे लढे लढविण्यासाठीही उभारायला हवी. विधिमंडळातील काम विधायक कार्य आणि अन्यायाविरुद्ध शांततापूर्ण संघर्ष ही या विरोधी आघाडीच्या कार्यक्रमाची त्रिसूत्री असायला हवी; पण गेल्या काही वर्षांत आमचे राजकारण निवडणुकांकडून निवडणुकांकडे अशाच पद्धतीने चाललेले आहे. त्यामुळेच देशापुढील महत्त्वाचे प्रश्न अनिर्णित राहिले आहेत. केवळ सरकारी निर्णयांनी हे प्रश्न सुटत नाहीत. त्यांच्या अंमलबजावणीसाठी निष्ठावंत कार्यकर्त्यांची प्रभावी संघटना हवी आणि नेमके त्याकडेच सर्व पक्षाचे दुर्लक्ष होत आहे. □


# व्हॅन गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका
माधुरी पुरंदरे

प्रकाशक
प्रसाद पुरंदरे
पर्वती, पुणे

बगाड ( १ )

# एक नवी झोपडपट्टी—पुणे विद्यापीठ

**बघ्या**

प्रत्येक काळाची काही निशाणी असते. ती डोळ्यांपुढे आणली की त्या कालखंडाचे सारे रूप ध्यानात येते. जसे, एकोणिसशे वीस ते पन्नास या काळाची खूण चरखा ही होती किंवा युरोपातल्या प्रबोधनकाळाचे प्रतिक म्हणजे उसळणाऱ्या लाटांवर डौलाने शिडे फुगवून नव्या जगाकडे निघालेले जहाज होते. आज आपण ज्या काळात जगतो आहोत त्याचे असे प्रतीक ठरवायचे म्हटले तर ते कोणते ठरवावे लागेल?

मला वाटते की, झोपडपट्टी हे आजच्या काळाचे खरेखुरे चिन्ह ठरेल. झोपडपट्टी ही सगळीकडे आहे. तुम्ही मुंबईहून दिल्लीला जा, कलकत्त्याकडे जा किंवा मद्रासकडे जा. प्रत्येक रेल्वेफाटयाच्या प्रत्येक स्टेशनच्या भोवताली झोपडपट्टी दूरवर पसरलेली दिसते. अस्ताव्यस्त, उघडी-बोडकी आणि उखीरवाखीर. मनुष्याच्या शरीरावर ठिकठिकाणी पडलेले कोडाचे डाग वाढत जाऊन जाऊन अखेर एकमेकात मिसळतात आणि शेवटी सारे शरीर म्हणजेच एक मोठा पांढरा डाग होऊन जाते त्याप्रमाणे रुळांच्या काठाने आणि स्टेशनांच्या भोवती वाढत जाणाऱ्या या झोपडपट्ट्या अखेर परस्परात मिसळून जाऊन बारामुल्ला ते कन्याकुमारी आणि पोरबंदर ते इंफाळपर्यंत एकच महान, विशाल आणि सर्वव्यापी झोपडपट्टी नजीकच्या भविष्यात उभी राहील अशी अपेक्षा आहे.

दरम्यान झोपडपट्टीतल्या रहाणीची विशिष्ट शैली आपल्या सार्वजनिक जीवनात ठिकठिकाणी दृष्टिगोचर होऊ लागली आहे. झोपडपट्टीतल्या जीवनात सातत्य आढळत नाही. भूक, तहान, वासना या प्राणिविशिष्ट गरजांचे सतत अस्तित्व सोडल्यास झोपडपट्टी प्रत्येक क्षण गेल्या आणि येत्या क्षणापासून संपूर्णपणे स्वतंत्र असे जगत असते. त्यामुळे तिथे केव्हा काय होईल याचा अजमास बांधता येत नाही. त्याचप्रमाणे झोपडपट्टीत एकाच वेळी नाना तऱ्हांचा गर्गशा चालू असतो. आरडा-ओरडा, गदारोळ किंवा फिल्मीसंगीत कोपऱ्याकोपऱ्यांतून का लागलेले असते ते कोणीच सांगू शकत नसले तरी प्रत्येकाला हे नक्की माहीत असते की, आपल्या कोपऱ्यातला गदारोळ विरुद्ध कोपऱ्यातल्या कोलाहलाला दडपून टाकील इतका मोठा झाला पाहिजे. त्यामुळे झोपडपट्टीच्या निरनिराळ्या भागातून नाना तऱ्हांचे कर्कश आवाज एकमेकांना गुदमरून टाकत आसमंतात भरून रहात असतात आणि ही नेहमीचीच गोष्ट असल्याने कुणालाच या आवाजांची दखल घ्यावीशी वाटत नाही.

## झोपडपट्टीचा संसर्ग

झोपडपट्टी साऱ्या देशाला ग्रासून उरणार असे भविष्य आम्ही वर वर्तविलेच आहे. झोपडपट्टीतील रयाशून्य जीवनशैली आपल्या सार्वजनिक संस्थांतून आढळून येऊ लागली आहे हे जो वर्तमानपत्रे वाचतो त्याला पटवून द्यावे लागणार नाही. तथापि झोपडपट्टीने गिळलेल्या सार्वजनिक संस्थांत पहिला क्रमांक विद्यापीठांचा लागेल आणि त्यातही विनीचे स्थान आपल्या पुणे विद्यापीठाला मिळेल असे वाटले नव्हते. झोपडपट्टीचा संसर्ग पुणे विद्यापीठाला सर्वांत शेवटी लागेल असा आमचा अंदाज होता.

असा अंदाज असण्याचे कारण विद्यापीठ ही पवित्र संस्था आहे आणि तिथला कारभार निर्मळ किंवा किल्मिषहीन असतो अशी भावुक व कालबाह्य कल्पना आम्ही बाळगून होतो, हे नव्हे. पुणे विद्यापीठात पैशांचे गैरव्यवहार होतात, पैसे घेऊन पदव्या दिल्या जातात, विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका प्राध्यापकच लिहितात वगैरे अफवा किंवा बातम्या वारंवार प्रसिद्ध होत असतात; परंतु असला भ्रष्टाचार ही प्रगतीसाठी घ्यावी लागणारी किंमत आहे अशी समजावणी विद्यापीठातील परदेश-पदवी-पुनीत प्राध्यापक वारंवार घालीत असतात. त्यामुळे भ्रष्टाचार वाढत आहे आणि त्याकडे लक्ष वेधण्यासाठी काही जण उपोषण करीत आहेत वगैरे बातम्या वाचल्या की आम्ही आनंदित होत असू; कारण किंमत जास्त मोजली की मिळणारी प्रगती अधिक चोख आणि भरपूर मापाची असणार अशी आमची खात्री होती.

आता कोणी विचारील की प्रगतीचा हा सौदा प्रामाणिक होता असे आम्ही का मानले? आमचे ज्येष्ठ मित्र प्रा. भिडे यांनी एखाद्या कंपनीच्या धर्तीवर विद्यापीठाचा कारभार चालवून स्वतःचा, विद्यापीठाचा आणि मुख्यतः ग्रामीण जनतेचा विकास साधण्याची जी अभिनव योजना मांडली होती तिचा परिचय आम्ही वाचकांना करून दिलाच आहे. अलीकडेच विद्यापीठाने ही योजना मान्य केली. तेव्हा पुणे विद्यापीठाची कंपनी झालीच म्हणायची. माल भरपूर किंमतीने पण चोख द्यायचा. तेव्हा भ्रष्टाचाराची भरपूर किंमत मोजल्यानंतर विद्यापीठ चोख प्रगती घडवून आणील अशी अपेक्षा गैरवाजवी कशी म्हणता येईल?

झोपडपट्टीविषयी निरनिराळी माणसे निरनिराळ्या कारणांनी तीव्र आस्था दाखवीत असली तरी त्या सर्वांचे यावर एकमत होईल की, झोपडपट्टी आणि प्रगती किंवा विकास या परस्परविरोधी गोष्टी आहेत. पुणे विद्यापीठ हे प्रगतिशील विद्यापीठ आहे. परदेशी विद्यापीठातील अभ्यासक्रम, उपकरणे, कार्यपद्धती यांची (आणि कदाचित् संशोधनाचीही) नक्कल करीत त्याने अग्रेसर विद्यापीठ अशी कीर्ती मिळविली आहे. त्यामुळे या विद्यापीठाला झोपडपट्टीतल्या बजबजपुरीचा संसर्ग लागलाच तर तो सर्वांत शेवटी लागेल असा आमचा तर्कशुद्ध विश्वास होता; परंतु या विद्यापीठाने स्वतःच सुरू केलेल्या सत्रपद्धतीचा जो खेळखंडोबा करून टाकला आहे, त्यावरून हे विद्यापीठ म्हणजे एक नवी झोपडपट्टी आहे, असे म्हटल्यावाचून राहवत नाही.

## विद्यार्थ्यांचा संप

जानेवारीच्या अखेरीस पुण्यातील काही कॉलेजेसच्या विद्यार्थ्यांनी संप केला. संपात एकाच वेळी दोन परस्परविरोधी मागण्या हे विद्यार्थी करत होते. झोपडपट्टीत एका कोपऱ्यात बारशासाठी लाऊडस्पीकरवर रेकॉर्ड लावतात आणि दुसऱ्या कोपऱ्यात मयतासाठी रडणाऱ्या बायका असतात, त्यापैकीच विद्यार्थ्यांची एक मागणी अशी होती की, पुणे विद्यापीठाने सुरू केलेली सत्रपद्धती बंद करण्यात यावी. त्याऐवजी काय करावे, हे मात्र ते सांगत नव्हते. दुसरी आणि नेमकी विरुद्ध मागणी अशी होती की, येत्या परीक्षासराईत विद्यापीठाने फक्त दुसऱ्या, चवथ्या आणि पाचव्या सत्राचीच परीक्षा घेण्याचे ठरवले होते त्यात बदल करून सर्व सत्रांच्या परीक्षा घ्याव्यात.

पहिल्यांदा विद्यार्थ्यांचा मोर्चा विद्यापीठावर गेला तेव्हा विद्वन्मंडळाची सभा भरली होती. त्या सभेने २–४–६ सत्रांच्या परीक्षांखेरीज फक्त ५ व्या सत्राची आणखी परीक्षा घ्यावी, उरलेल्या म्हणजे १ व २ सत्रांच्या परीक्षा घेता येणार नाहीत असा स्पष्ट ठराव केला. कुलगुरु डॉ. ताकवले यांनी तो ठराव मोर्चाला समजावून सांगितला. मोर्चातील विद्यार्थ्यांची तुटपुंजी संख्या पाहून मोर्चा प्रातिनिधिक नसावा असा कुत्सित अंदाजही व्यक्तविला. त्यानंतर कुलसचिव भोसले यांनी विद्यार्थ्यांना गोंजारणारे एक पत्रकही काढले.

त्यानंतर विद्यार्थ्यांत थोडी चलबिचल झाली होती आणि संप संपेल असेही वाटत होते; पण तीन दिवसांनी विद्यार्थ्यांचे एक शिष्टमंडळ कुलगुरूंच्या भेटीला गेले असता कुलगुरूंनी सर्व सत्रांच्या परीक्षा घेण्यात येतील असे जाहीर केले. इतकेच नव्हे तर या परीक्षा व्यवस्थितपणे आणि तत्परतेने कशा पार पडतील याचे उपाय सुचविण्यासाठी प्रा. नूलकर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थी-प्रतिनिधींचा समावेश असलेली एक समितीही नेमली. सत्रपद्धती संपविण्याच्या मागणीचे काय झाले हे मात्र कळलेच नाही.

या सगळ्यात गळवटात कोण निघाले असतील तर ते विद्वन्मंडळाचे सभासद! त्यांनी पूर्ण विचारान्ती घेतलेला निर्णय त्याच सभेचे अध्यक्ष असलेल्या कुलगुरूंनी अवघ्या तीन दिवसांत रद्द–बातल केला! सर्व सत्रांच्या परीक्षा एकाच मोसमात घेणे अशक्य आहे असे युनिव्हर्सिटीच्या परीक्षा विभागाचे ठाम मत असताना प्राचार्य नूलकर आणि त्यांचे विद्यार्थी-सौंगडी असा कोणता इलम शोधून काढणार आहेत की त्यामुळे परीक्षा चुटकीसरशा घेता येतील? असा इलम शोधून काढणारी डोकेबाज माणसे मौजूद आहेत हे माहीत होते, तर मुळात विद्यापीठाने हा संप ओढवून घेतलाच कशाला?

झोपडी-वस्तीतील जीवनाचे एक वैशिष्टय म्हणजे तेथे केव्हा काय घडेल हे सांगता येत नाही, तोच गुणधर्म विद्यापीठाने, परीक्षांबाबत हे जे उलटसुलट निर्णय अवघ्या तीन दिवसांत घेतले त्यातून दिसून घेतो.

## सत्रपद्धतीचा खेळखंडोबा

असो. यावरून दिसून येईल की, सत्रपद्धती नष्ट करा अशी एक घोषणा संपकरी विद्यार्थ्यांची असली तरी ते त्यांचे धोरण नव्हते आणि ती घोषणा त्यांनी पुढे रेटली नाही. उलट सत्रपद्धतीची एक फायदेशीर बाब म्हणजे वारंवार होणाऱ्या परीक्षांमुळे विद्यार्थ्याला त्याच्या गतीने अभ्यास करता येणे. ती घालविण्याची विद्यार्थ्यांची तयारी नाही. विद्यापीठीय नोकरवर्गाचा सत्रपद्धतीला विरोध नाही. फक्त इतक्या परीक्षांचे काम त्यांना पेलवत नाही; परंतु प्राचार्य नूलकर आणि त्यांच्या समितीचे डोकेबाज सभासद यावर तोडगा काढणार आहेतच! अशा स्थितीत सारे कसे शांत शांत व्हायला हवे होते.

पण आपण पाहिलेच की, सततचा गर्गशा आणि अस्वस्थता हा झोपडपट्टीचा गुणधर्म आहे. विशेषतः झोपडपट्टीतील दादांना स्वस्थता असह्य वाटते. काही ना काही क्लृप्त्या काढून झोपडपट्टी खदखदत ठेवण्याचे काम ही मंडळी करीत असतात. बरे, या दादांचे झोपडपट्टीत काही गुंतलेले किंवा पणाला लागलेले असते असेही नाही. कारण झोपडी ही सरकारी जमिनीवर बांधलेली असते आणि नाडलेला बिऱ्हाडकरू त्यात रहात असतो. हे दादा फक्त भाडेवसुली आणि नसत्या घालमेली करत असतात. नेमकी ही स्थिती पुणे विद्यापीठाला जोडलेल्या कॉलेजेसच्या संचालक मंडळाची, विशेषतः त्यांचे प्रतिनिधी असलेल्या प्राचार्यांची आहे.

या प्राचार्यांनी स्वत:चा एक फोरम काढला आहे. कॉलेजेसच्या जाहिरातीसाठी आसुललेली आणि कुठल्याही बाबतीत अधिकारीवर्गाच्या अनुषंगाने चालणारी वर्तमानपत्रे या फोरमच्या कार्याला फोटोसकट प्रसिद्धी कधी देत असतात. या फोरमने सत्रपद्धती नको असा ठराव पूर्वीच केला आहे. आणि सत्रपद्धतीच्या कामामध्ये खोडा घालण्याचा प्रयत्न ही प्राचार्यमंडळी सतत करीत असतात.

या प्राचार्यांच्या एका समितीने असे ठरवले आहे की, नव्या त्रैवार्षिक अभ्यासक्रमातील पहिल्या वर्षाची परीक्षांची सर्व जबाबदारी कॉलेजेसकडे सोपविण्यात यावी आणि रंग असा दिसतो की, ही योजना विद्यापीठ मान्यही करील. अखेर झोपडपट्टीत अशी कोणती गोष्ट असते की, दादांची इच्छा असताना अंमलात येत नाही? परंतु विद्यापीठाने ही योजना मान्य केली तर आजवरच्या आपल्या धोरणाला हरताळ फासल्यासारखे होईल.. अर्थात् आपण पाहिलेच आहे की, झोपडपट्टी प्रत्येक क्षण स्वतंत्रपणे जगत असते. मागच्या आणि पुढच्या क्षणांचा संदर्भ देणे हे येथे असंबद्ध आहे.

## प्रत्येक क्षण असंबद्ध

विद्यापीठाचे आजवरचे धोरण असे होते की, महाविद्यालयाकडून परीक्षा शक्य तितक्या आपल्याकडे घेणे. याचे मुख्य कारण म्हणजे महाविद्यालये ज्या प्रकारे स्वत:च्या विद्यार्थ्यांची चाचणी घेतात त्यावर विद्यापीठाचा विश्वास नाही. आजही प्रत्येक विद्यार्थ्याचे ४०% गुण महाविद्यालयांच्या अखत्यारात आहेत; पण पदव्युत्तर वर्गात प्रवेश देताना स्वत: विद्यापीठ ते गुण विचारात घेत नाही. विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षेतील गुण महाविद्यालयीन गुणांपेक्षा कमी असल्यास विद्यालयाने दिलेले गुण कमी करून विद्यापीठाने दिलेल्या गुणांच्या जोडीस आणून बसवले जातात. उलट विद्यालयाने दिलेले गुण बाह्य परीक्षेतील गुणांपेक्षा कमी असतील तर ते वाढवले मात्र जात नाहीत. यावरून हे स्पष्ट होते की, विद्यार्थ्यांची चाचणी आपल्या हातात ठेवणे हे विद्यापीठाचे आजवर उद्दिष्ट

होते. असे असताना एकाएकी दादांची मर्जी फिरली म्हणून विद्यापीठाने आपले धोरण पूर्णपणे उलटे फिरवावे यात झोपडपट्टीपण दिसते असे म्हटले तर ते कठोर वाटले तरी वस्तुस्थितीचे निदर्शक आहे, असेच म्हटले पाहिजे.

विद्यापीठाचे झोपडपट्टीत जे रूपांतर होत आहे त्याला विद्यापीठाशी संलग्न असे सर्वच घटक जबाबदार असले तरी त्यातला मोठा वाटा प्राचार्यदादांकडे जातो असे म्हणावे लागेल. सत्रपद्धतीचाच विषय घेतला तरी विद्यापीठाच्या मूळ हेतूचा शक्य तितका विपर्यास या मंडळींनी केला आहे. व्याख्यानवर्ग, पाठवर्ग, प्रयोगवर्ग यातील विद्यार्थी संस्थांवर बंधने घालणारे नियम त्यांनी झुगारून दिले आहेत. कॉलेजातील शिक्षकवर्गाकडून हा अभ्यासक्रम नीट राबवला जावा यासाठी त्यांच्या आजवरच्या कामाच्या पद्धतीत मूलगामी बदल घडवून आणावयास हवे होते. ते बदल घडवून आणण्याची उपक्रमशीलता, दीर्घोद्योग आणि आस्था या लोकांनी कधी दाखवली नाही. सत्रपद्धतीविषयी आत्मीयता प्राचार्यांना कधी वाटलीच नाही. तेवढा हुरूप नसलेली मंडळीच या पदापर्यंत पोचतात की काय ते कळत नाही.

विद्यापीठाची झोपडपट्टी कधी झाली आहे हे दर्शविण्यासाठी सत्रपद्धती हा विषय केवळ बानगीदाखल घेतला. इतर अनेक अंगांनी विद्यापीठाची झोपडपट्टीच्या दिशेने होणारी वेगवान वाटचाल दाखवता येईल. विद्यापीठाने युगधर्माचे पालन केलेच पाहिजे. भविष्याची चाहूल विद्यापीठांनाच प्रथम लागली पाहिजे. झोपडपट्टी ही भविष्याची लाट आहे. तिचा मोकळ्या मनाने स्वीकार आमच्यासारख्या जुनाट माणसांना सतावणारा वाटला तरी तो शहाणपणाचा आहे हे मान्य केलेच पाहिजे!

# सावन जो अगन लगाये, उसे कौन बुझाये ?

नालंदा मेडिकल कॉलेजातील २३ वर्षे वयाची विद्यार्थिनी परिचारिका कुमारी मेरीचा रहस्यमय मृत्यू झाल्यापासून बिहारमधील रुग्णालयातील बेबंदशाही, डॉक्टरांची मिरासदारी, भ्रष्टाचार आणि रोग्यांची उपेक्षा याकडे पुन्हा एकदा लोकांचे लक्ष वेधले आहे. ही रुग्णालये म्हणजे रोग्यांच्याकरता कोंडवाडे आणि सफेद पोषाखातले डॉक्टर आणि डॉक्टरी शिकणारी बड्या बापांची स्वच्छंद पोरे यांचेकरता 'वेश्यालये' झालेली आहेत. कुमारी मेरीच्या हत्येपासून बिहारच्या रुग्णालयांतून चालणारे दुराचार आणि व्यभिचार याकडे आपोआप लक्ष वेधले जाते.

कुमारी मेरी ही कालिकतची एक सुरेख मुलगी होती. नालंदा नर्सिंग कॉलेजमध्ये ती तिसऱ्या वर्षाला शिकत होती. नालंदा मेडिकल कॉलेजच्या सर्वात गुंड विद्यार्थ्याशी तिचा संबंध होता. सुरुवातीला तिला घाबरवून, धमक्या देऊन त्याने तिला आपले शरीर समर्पण करायला भाग पाडले होते. नंतर त्याने तिच्यावर प्रेम असल्याचा आणि तिच्याशी लग्न करण्याचाही बहाणा केला होता. खुनानंतर पोलिसांनी तिच्या खोलीची झडती घेतली, तेव्हा तिथे एक छोटी पेटी सापडली. त्यावर इंग्रजीत शाईने लिहिलेला मजकूर होता. 'मेरी, जीवन आहे केवळ तुझ्यावर प्रीति करण्यासाठी.' खाली लिहिणाऱ्याचे नावही आहे, पण पोलीस ही पेटी दाखवायला किंवा त्यावरचे नाव सांगायला तयार नाहीत!

याबाबतीत कुमारी मेरीच्या मैत्रिणींशी बातचीत केल्यावर असे समजले, की नित्याप्रमाणे त्या दिवशीही मेरी ड्यूटीवरून परत आली. ८ वाजण्याच्या सुमारास तिचा तथाकथित प्रियकर आपल्या एका मित्रासह परिचारिका – वसतिगृहात आला. मेरी तयार होऊन त्या दोघांचेबरोबर बाहेर पडली ती त्या रात्री परत आलीच नाही! दुसऱ्या दिवशी सकाळीही ती आली नाही. जेव्हा १ डिसेंबरला रेल्वेलाइनवर तिचा छिन्नविछिन्न मृतदेह सापडला तेव्हा तिच्या मैत्रिणींना तिचा थांगपत्ता लागला. तिची रूमपार्टनर संतम्मा हिला विचारता असे समजले की, या परिचारिका–वसतिगृहावर पहारा करण्यासाठी फक्त एक रखवालदार असतो; तिथे येणाऱ्या जाणाऱ्या लोकांचेवर कसलेही निर्बंध नाहीत. तिथल्या मुलींना जबरदस्तीने पळवून नेण्याचेही प्रयत्न काही गुंडांनी केले होते; पण सामूहिक प्रतिकार झाल्यामुळे आणि आरडाओरडा झाल्यामुळे त्याला यश आले नाही. परिचारिकांनी असेही सांगितले की, या खुनानंतर त्यांना गुंडांनी येऊन धमक्या दिल्या की, या प्रकाराबद्दल कुठे काही बोललात तर प्राणाला मुकावे लागेल. त्यामुळे त्या सर्वजणी अतिशय भीतिग्रस्त तणावात आहेत. मेट्रन तर इतकी घाबरून गेली आहे की तिने मृतदेह ओळखायचीसुद्धा तयारी दर्शवली नाही. त्यामुळे गुंडांची नावे माहीत असूनही विद्यार्थिनी बोलायला तयार नाहीत. वसतिगृह इथून हलवावे, आपल्या सुरक्षेची व्यवस्था करावी या मागणीकरिता परिचारिका संपावर गेल्या. या वसतिगृहात ३८ परिचारिका राहतात. त्यातल्या ३५ केरळीय आणि ३ बंगाली आहेत. या सर्व कुमारिका आहेत.

असे समजते की, या खुनातील अपराध्यांना वाचवण्याकरता पाटणा आणि नालंदा मेडिकल कॉलेजमधील एका विशिष्ट जातीच्या बड्या डॉक्टरांनी उच्च थरावर प्रयत्न सुरू केले आहेत. पाटण्यामध्ये बड्या डॉक्टरांचा संघटित गट आहे, त्यांच्यापुढे राजकारणी

लोकांनाही मान झुकवावी लागते. विसर्जित सरकारचे आरोग्यमंत्री लालमुनी चौबे यांनी रुग्णालयांच्या कारभारात सुधारणा घडवून आणण्यासाठी आणि डॉक्टरांची मिरासदारी आणि भ्रष्टाचार थांबवण्यासाठी पावले टाकली; त्यावर १७ नोव्हेंबर रोजी अखिल भारतीय शल्यचिकित्सक संघटनेच्या पाटणा शाखेच्या संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून त्यांना बोलावून डॉक्टरमंडळींनी त्यांनाच अपमानास्पद वागणूक दिली. नंतर झालेल्या पत्रकार परिषदेत आरोग्यमंत्र्यांनी रहस्यस्फोट केला, की त्यांना ठार करण्याची डॉक्टर मंडळींची योजना होती. डॉक्टरांना राग येण्याचे कारण म्हणजे तीन वर्षांपेक्षा जास्त काळ एका ठिकाणी राहणाऱ्या ६८३ डॉक्टरांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या आणि रोग्यांचे अन्न आणि औषधे यांच्या चोऱ्या करताना सापडलेल्या डॉक्टरांचे विरुद्ध फौजदारी खटले चालवण्याचे आदेश देण्यात आले होते. पाटणा मेडिकल कॉलेजमध्ये वर्षानुवर्षे शिकवण्याच्या नावाखाली लूटमार करणाऱ्या डॉक्टरांच्या बदल्या करण्याची तसेच या मंडळींची खाजगी प्रॅक्टिस बंद करण्याची योजना आरोग्यमंत्र्यांनी तयार केली होती. या गोष्टीमुळे, धाबे दणाणल्यामुळे, आरोग्यमंत्र्यांना वादविषय बनवण्याची आणि त्यांची या खात्यावरून उचलबांगडी करण्याची योजना डॉक्टरमंडळींनी आखली होती. आता नवीन निवडणुका झाल्यावर काय स्थिती होते ती पाहायची. सध्या तरी 'कुमारी मेरीच्या खुनाचा शोध लावा आणि आमच्या सुरक्षिततेची हमी द्या ' या मागण्यासाठी परिचारिका संपावर गेल्या आहेत.

समाजस्वास्थ्याचे रक्षण करणे हे डॉक्टरमंडळींचं काम. त्यांनीच असे सामाजिक नीतिमूल्यांचे भक्षण सुरू केलेले वाचल्यावर मनात आले–

चिनगारी आग लगाये
सावन उसे बुझाये,
सावन जो अगन लगाये
उसे कौन बुझाये ?

**' दिनमान 'वरून**
**डॉ. शरद अभ्यंकर, वाई**

□

# मथुरा

' हा बलात्कार नव्हे ! हा तर संभोग झाला ' असा निवाडा सुप्रीम कोर्टाच्या तीन न्यायाधिशांनी ' मथुरा ' नावाच्या १६ वर्षे वयाच्या शेतमजूर मुलीवर पोलिसांनी केलेल्या बलात्काराच्या खटल्याबाबत दिला. ज्या गणपत नावाच्या पोलिसाने तिच्यावर बलात्कार केल्याचा आरोप होता त्याला ती पूर्वी कधी ओळखतही नव्हती आणि तरीही तिने संभोगाला 'खुषीने संमती' दिली असली पाहिजे असे न्यायाधिशांनी जाहीर केले. या निष्कर्षाचे कारण ? न्यायाधिशांनी आपल्या निकालात म्हटले आहे, ' पोलिसाच्या अंगावर कुठेही ओरखडा दिसला नाही. मथुराचे कपडे फाटलेले आढळले नाहीत, याचा अर्थ तिने विरोध किंवा प्रतिकार केलेला नाही. कायद्यामध्ये ' स्त्रीला मरणाची किंवा दुखापतीची भीती दाखवून संभोगाला संमती मिळविण्यात आली असेल तरच त्या संभोगाला बलात्कार असे म्हटले आहे. '

दुसरी महत्त्वाची गोष्ट न्यायालयाने नमूद केली आहे की, वैद्यकीय तपासणीप्रमाणे ' मथुराला समागमाची सवय होती ' या नोंदीवरून मथुरा वाईट चालीची होती, त्यामुळे तिच्या संमतीविना संभोग हा समर्थनीय ठरतो असे न्यायालयाला सूचित करायचे आहे काय असे निवाड्यावरून वाटते. परिणाम, जबानीसाठी रात्री पोलिसस्टेशनमध्ये बोलावून मथुरेवर बलात्कार करणारे दोन्ही पोलीस निर्दोष सोडले गेले. हायकोर्टाने दिलेला निवाडा फिरविला गेला.

बलात्काराची घटना घडली २६ मार्च १९७२ रोजी. मथुरा ही चंद्रपूर जिल्ह्यात राहणारी शेतमजूर मुलगी. आईवडील वारल्यामुळे मोठ्या भावाकडे रहात होती. अशोक नावाच्या मुलावर तिचे प्रेम जडले. त्याच्याशी लग्न करायचे म्हणून ती अशोकच्या मावशीकडे जाऊन राहिली. भावाने पोलिसठाण्यावर जाऊन मथुरेला पळवून नेले म्हणून तक्रार केली. तुकाराम व गणपत या दोन पोलिसांनी सर्वांना जबानीसाठी रात्री बोलावून घेतले. मथुरेच्या नातेवाइकांना बाहेर थांबायला सांगून मथुरेला जबानीसाठी आत बोलावले. बराच वेळ मथुरा बाहेर येईना. म्हणून नातेवाइकांनी आरडाओरडा केला, आत जाऊन बघितले, ठाण्याचे दार आतील बाजूने लावलेले, दिवे मालविलेले. बऱ्याच आरडाओरडीनंतर पोलिसांनी मागचे दार उघडून पोबारा केला. मथुराही बाहेर आली ते बलात्कार केला असे सांगतच.

आश्चर्य म्हणजे राज्यसरकारने या दोन्ही पोलिसांवर खटला भरण्याचे मनावर घेतले सेशन कोर्टात जिल्हा न्यायालयापुढे केस चालली. कोर्टाने निर्णय दिला, ' आपण सच्छील आहोत हे दाखविण्यासाठी मथुराने बलात्काराची कथा मनाने रचली. तिने दोन पोलिसांना तीव्र प्रतिकार केला ही गोष्ट धादांत खोटी आहे. ' या निर्णयावर सरकारने हायकोर्टामध्ये अपील केले. हायकोर्टाने दोन्ही पोलिसांना दोषी ठरवून शिक्षा ठोठावली. ' रात्रीच्या वेळी पोलिसस्टेशनवर दोन पोलिसांच्या सान्निध्यात मथुरेला स्वसंरक्षण करता येणे शक्य नसल्याने ती पोलिसांच्या वासनेला बळी पडली असावी असा निकाल दिला. केस पुन्हा सुप्रीम कोर्टात गेली आणि तेथे हायकोर्टाचा निर्णय फिरविण्यात आला.' ' पोलिसांच्या गुन्ह्याबद्दल आवश्यक पुराव्याअभावी आम्ही त्यांना निर्दोष सोडत आहोत ' असे निकालात म्हटले आहे.

हा निवाडा झाला सप्टेंबर १९७८ मध्ये आणि तो विसरलाही गेला. बरेच महिन्यांनी उपेंद्र बक्षी या दिल्लीतील लॉ कॉलेजच्या प्राध्यापकांच्या वाचनात कायदाविषयक मासिकामध्ये हा निवाडा आला आणि कायद्यावर बोट ठेवून उलटया काळजाने दिलेला निर्णय असे त्यांचे मत पडले. त्यांनी व इतर तीन वकिलांनी–वसुधा धगमवार, लोतिका सरकार व रघुनाथ केळकर यांनी मुख्य न्यायाधिशांना पत्र लिहून या खटल्याची पुनर्सुनावणी करण्याची विनंती केली. या निवाड्यामुळे हजारो, लाखो मथुरांचा मानवी हक्कासाठी केला जाणारा आक्रोश दडपला जाईल म्हणून ह्या निवाड्याचा निषेध केला.

□

[ –बलात्कार विरोधी मंच पत्रकावरून ]

# बँका : राष्ट्रीयीकरण झाले. आता ग्रामीकरण हवे

एक बँक अधिकारी, धुळे

बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्याला दहा वर्षाचा काळ लोटून गेला आहे. राष्ट्रीयीकरण झाले तेव्हा या प्रमुख बँका व स्टेट बँका, यांच्या कार्याने ग्रामीण भागात बँकिंग पोहचेल, रोजगार वाढेल, अर्थपुरवठा होऊन सावकारी कमी होईल, एकूणच ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळेल इत्यादी अपेक्षा केल्या गेल्या होत्या व अजूनही केल्या जात आहेत. तथापि आजची प्रत्यक्ष परिस्थिती पाहिली की, असे दिसते की, आजच्या परिस्थितीबाबत खूष कोणीच नाहीत, नाखुषी मात्र बरीच आहे; पण ही नाखुषी एक तर सहसा शब्दांकित होत नाही व झालीच तर ती स्पष्ट शब्दांकित होत नाही असे दिसते. ग्रामीण भागात आम्ही गेल्याने आमचे तोटे वाढतात व पुष्कळशा प्रमाणात पैसे गुंतून पडतात व कित्येक रकमा तर बुडितखाती टाकाव्या लागतात असा खालच्या पट्टीतला सूर बँकांच्या बाजूने लावला जातो, तर बँका केवळ दाखविण्यासाठी खेडचात शाखा उघडतात, त्यांचा आम्हाला उपयोग नाही, असा मध्यम सूर लावताना, खेडचातील लोक आपली नाराजी अस्पष्ट भाषेत व्यक्त करून, 'बँकांनी आता तरी करावे' अशी अपेक्षा व्यक्त करीत असतात.

आजची खरी परिस्थिती काय आहे याची ओझरती पाहणी केल्यास असे दिसते की, अगदी काही झाले नाही असे नाही. झाले आहे ते बरेच आहे; पण एकंदर करावयाचे त्याचा विचार केला तर आजवर जे झाले आहे, ते करावयाचे राहिले आहे, त्यापेक्षा खूपच कमी आहे; पण हे एवढेच नाही, तर याहीपेक्षा अत्यंत महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, ज्यांच्यापर्यंत आपण पोहोचू व ज्यांना हात देऊन समाजातील इतर घटकांच्याबरोबर खेचू अशी आपली अपेक्षा होती, त्यांच्यापर्यंत आपण फारसे, पुरेशा प्रमाणात पोहचलेलो नाही. याबाबतीत आपला उद्देश मोठा असला तरी प्रत्यक्षात प्रयत्नात आपण कमी पडतो, असे या दुर्बलातील सुशिक्षितांचे मत पडते आहे.

बँकांना या क्षेत्रात म्हणावेसे यश आलेले नाही, असे ग्रामीण भागातील कित्येकांचे म्हणणे असते आणि त्याच वेळी आता अजून अपयश घ्यावयाचे नाही, घेतलेच तर ते तोलून-मापून, समजून-उमजून घेऊ असे बँकांचे कारभारसूत्र करावयाची बँकांची इच्छा असते या दोन्ही म्हणण्यात तथ्यांश आहे. बँकांचे पैसे बुडता कामा नयेत, वेळेवर वसूल झाले पाहिजेत व बँकांना पुरेसे नफेशीर व्यवहार झाले पाहिजेत हे खरेच आहे; पण याचा अर्थ हे आणि एवढेच झाले की काम झाले असे नाही. श्रीमंत आणि धनवानांच्याकडे आपल्या कृपेचा ओघ पुरेपूर वळवण्यात व एवढेच करण्यात बँका शंभर टक्के यशस्वी होतील, होतात; पण हे होण्यात, करण्यात पाठ थोपटून घेणारे विषमतेला चालना देत आहेत, दुर्बलांची दुःखे व कष्ट वाढवीत आहेत व केवळ ठेवी, सुरक्षित कर्जे, उत्तम नफ्याच्या मागे लागून आत्मप्रौढी व आत्मखुषी मिरवीत आहेत. दुर्बलांना, गरजूंना, हातभार लावून, कार्यप्रवण करणे, त्यांचे उत्पादन, उत्पन्न वाढविणे व त्यांच्या वाढत्या उत्पादनाच्या विक्रीरकमेतून बँकेच्या कर्जाची परतफेड करून घेणे, परतफेडीची सवय लावणे, हेच खरे कार्य आहे. हे करण्यातच समाधान व समाजहित सामावलेले आहे.

पण या खऱ्या कर्माच्या दिशेने, आपली जी प्रगती चालू आहे, ती अतिशय संथ आहे. खेडचांत बँका गेल्यावर, बँकांच्याकडे गावातल्या सर्वांनी आपले पैसे सुरक्षित ठेवावेत, बँकांच्या कर्जव्यवहारामुळे खेडचातली सावकारी कमी व्हावी, खेडचात आर्थिकदृष्टचा दुर्बलांना कर्जपुरवठा व्हावा, शेती सुधारून रोजगारवृद्धी, उत्पादनवृद्धी व्हावी व एकूणच अर्थव्यवस्थेला चालना मिळावी अशा अपेक्षा होत्या व आहेत; पण प्रत्यक्षात, आज बँका खेडचात गेल्यात; पण गरिबांच्याकडे पुरेशा गेलेल्या नाहीत. बँकांनी काही कार्य जरूर केले आहे; पण एकूण दृष्टिकोनाचाच विचार केला तर खेदपूर्वक असे म्हणावे लागते की, बँका खेडचात गेल्यावरही आपला परंपरागत बँकिंगचा दृष्टिकोन घेऊन गेल्या आहेत. ठेवी मिळविणे, हात राखून निवडक लोकांना कर्जे देणे व सावकारी पद्धतीप्रमाणे नफ्यावर डोळा ठेवणे, या गोष्टी मनाशी पक्क्या ठरवून, बँकांचे अधिकारी ग्रामीण भागात बँकिंग करत असतात. अर्थात यात चूक नाही, हे व्हावयालाच पाहिजे; पण याच्याच जोडीला, गरजूंना अर्थपुरवठा, रोजगारनिर्मिती, उत्पादनवाढ याही गोष्टी बँकिंगच्या व समाजाच्या एकूण व अंतिमतः हिताच्या आहेत, याची खूणगाठ बँकांच्या अधिकारी मंडळींनी बांधून दृष्टिकोन बदलला पाहिजे.

'बँकांच्या बाजूने आज खेडचातल्या बँकांच्या बाबतीत, वाढत्या थकबाक्यांचा, बुडित कर्जांचा बँका विचार करीत आहेत व ते योग्यच आहे. आजवर जे झाले ते पुढे होऊ नये यासाठी पाउले जपून टाकली पाहिजेत. खऱ्या गरजूंपर्यंत, बँका पुरेशा प्रमाणात पोचलेल्या नाहीत, याला बँकांच्या अधिकारीवर्गाचा दृष्टिकोन कारणीभूत आहे. त्याचप्रमाणे थकबाकी व कर्जबुडवेगिरीमागे बँकांना या क्षेत्रात अनुभव नव्हता हे कारण आहे. शेतीकर्जव्यवहाराचा अनुभव नसलेले बरेच अधिकारी शेतीकर्जव्यवहार करीत होते व अजूनही काही ठिकाणी करीत आहेत.

### प्रतिसाद लाभू शकतो

खेडेगावात बँका काढल्यावर तेथे काम करण्यास जाणारी मंडळी ही केवळ नाइलाज म्हणून जातात व सारखा बदलीचाच प्रयत्न करीत असतात. खेड्यातल्या जीवनात सुखसोयी नसतात हे खरे आहे; पण देशासाठी, खेड्यातील अशिक्षित गरिबांच्या सेवेसाठी आपल्या आयुष्यातली पाच वर्षे, तीन वर्षे देखील, मनःपूर्वक द्यावयाची लोकांची तयारी नसते ही वस्तुस्थिती बऱ्याच वेळा दिसून येते. खरे तर ही सेवा पगारी असते व ती मनःपूर्वक केल्यास लोक केवळ प्रतिसाद किंवा धन्यवाद देत नाहीत, तर कायम कृतज्ञतेची भावना ठेवतात. म्हणून खेड्यातल्या बँकेत जाणाऱ्या बँकेच्या लोकांनी थोडा विशाल दृष्टिकोन ठेवण्याची गरज आहे. खेड्यात राहणारे लोकही याच देशातले आहेत. त्यांचे उत्पादन हेच खरे तर प्रमुख, प्राथमिक व महत्त्वाचे उत्पादन आहे. त्यांच्या परिश्रमांचा वाटा बराच मोठा आहे, म्हणून त्यांच्या हितसंवर्धनाची व संरक्षणाची संधी आपण साधली पाहिजे. खेड्यात बँकेने मनःपूर्वक व योजनाबद्धरीत्या काम केले तर पाच वर्षांत ते खेडेगाव व त्या खेडेगावाच्या आसपासची निदान चार खेडी यांचा चेहरामोहराच बदलू शकेल.

परंतु आज मात्र बँका खेडेगावात गेल्यात त्यांच्यात दोन भाग स्पष्ट पडतात. काही बँका अशा असतात की, त्यांनी पाऊल एवढे जपून टाकलेले असते की, त्यांचे खऱ्या अर्थाने अर्धेही पाऊल पडलेले नसते. अर्थात परंपरागत चालत आलेल्या बँकिंगच्या बाबतीत मात्र त्यांची प्रगती बऱ्याच वेळा वाखाणण्यासारखी असते. उदाहरणार्थ गावातले श्रीमंत सावकार, श्रीमंत व्यापारी (आणि बडे बागाईतदारही) यांनी या बँकात आपले बस्तान बसवलेले असते. गंमत पहा. सावकारी कमी करावी, हा उद्देश कुठे आणि, क्वचित का होईना सावकारी करणारांना कर्जसहाय्य होते हे कुठे! पण या लोकांच्या कर्जव्यवहाराला एक तात्त्विक स्वरूप देण्याचा आव आणलेला असतो. उदाहरणार्थ ही मंडळी ठेवी ठेवतात, यांच्यामुळे लोक ठेवी ठेवतात किंवा ह्या मंडळींच्यामुळे बँकांची भरभराट होते, इत्यादी! इत्यादी! खरे तर खरी परिस्थिती अशी आहे की, बँकातून ठेवी ठेवणारी मंडळी वेगळीच आहेत व असतात व ह्या मंडळीत, मुख्यत्वे मध्यमवर्गाचा समावेश होतो; पण ही श्रीमंत सावकार, व्यापारी, बागाईतदार मंडळी मात्र मधाचे बोट दाखवून नादी लावत असतात.

खेडेगावातल्या बँकांचा दुसरा प्रकार असतो तो भरपूर कर्जवाटप केलेल्या व बरीच कर्जे थकलेल्या बँकांचा. या बँकांची बरीच कर्जे थकतात, याला बरीच कारणे असतात. जी कारणे आपल्या हातातली नाहीत, त्याबाबतीत आपण काही करू शकत नाही. उदाहरणार्थ दुष्काळ! पण या कारणाव्यतिरिक्त इतर कारणे असतात. ती दूर होणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ श्रीमंत पुढारी स्वतः वेळेवर कर्जे भरीत नाहीत व इतरांनाही असे सांगत असतात. यामुळे एकूण वातावरणावरच वाईट परिणाम होतो. तसेच कित्येक वेळा कर्जे, घेतलेल्या कारणाव्यतिरिक्त इतर कारणांसाठी वापरली जातात व मग ती कर्जे थकतात. हे कर्जे थकण्याचे कारण कमी करावयाचे असेल तर सातत्याने पाठपुराव्याला पर्याय नाही; पण या सातत्याने पाठपुराव्या (फालोअप) बाबतीत बँकांची व्यावहारिक अडचण ही आहे की बँकांच्याजवळ पुरेसे कर्मचारी नसतात.

आपल्या देशाची आर्थिक परिस्थिती ही शेतीउत्पादनावर बहुतांशी अवलंबून आहे. यामुळे ग्रामीण विभागांत, बँकिंग याचा अर्थच मुळी गरजू शेतकरी. शेतीचा पूरक व्यवसाय करणारे इतर यांच्यापर्यंत कर्जव्यवहार पोहचवून, उत्पादन व रोजगार वाढविणे होय. आपल्या समाजापैकी सत्तर टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत व जवळजवळ तेवढेच लोक आजही खेड्यात राहतात. इतर प्रगत समाजातील वर्गवारीप्रमाणे आपला समाज केवळ 'आहे रे' 'नाही रे' मध्ये फक्त दुभंगलेला नाही तर आपला समाज, गरीब–श्रीमंत, सुशिक्षित–अशिक्षित, शहरी–ग्रामीण, अशा तीन प्रकारात दुभंगलेला आहे. यामुळे साधा सरळ पुस्तकी तत्त्वे व उपाय योजून आपण प्रश्न सोडवायला गेलो तर ते फार तर सुटल्यासारखे थोडा वेळ वाटतात. हे प्रश्न सोडविण्यासाठी, खरोखरी, समाजहिताचा दृष्टिकोन, त्याला अनुभवाची जोड व सेवाभावी निःस्वार्थी कार्यकर्ते यांचे सतत सहकार्य, यांची आवश्यकता आहे. अनेक प्रकारे आपला समाज दुभंगलेला असला तरी प्रत्यक्षात ढोबळ मानाने सुस्थित व सुशिक्षित आहे तर खेड्यात राहणारे बहुतांश लोक हे गरीब व अशिक्षित आहेत. या खेड्यातल्या गरीब व अडाण्यांच्यापर्यंत जाऊन त्यांना अर्थसहाय्य करणे, त्यांना जोमाने कामाला लावणे, त्यांची आजवर होत आलेली पिळवणूक थांबविणे, त्यांना चरितार्थाची साधने, व्यवसाय पुरविणे, त्यांचे उत्पन्न वाढविणे, हेच खरे खेड्यातल्या बँकांचे काम आहे.

आपल्या देशातल्या प्रत्येक जिल्हा विभागाचा विचार केला तर सर्वसाधारण असे दिसते की, जिल्ह्यात, दहा ते पंधरा तालुके असतात व साधारपणे प्रत्येक जिल्ह्यात सुमारे एक हजार खेडी असतात. आज प्रत्येक खेड्यापर्यंत बँका पोहचलेल्या नाहीत. एवढेच नव्हे तर दहा गावांना एक बँक हेही प्रमाण पडत नाही; पण आपण दहा गावांना एक बँक असण्याची आवश्यकता मानली तर जिल्ह्यात निदान शंभर बँका असल्या पाहिजेत; पण नुसत्या शंभर असल्या तर त्यातल्या पंचवीस तरी जिल्ह्याच्या ठिकाणी व पंचवीस तालुक्याच्या ठिकाणी होणार याचा विचार केला तर निदान दोनशे तरी बँकांच्या शाखा असल्या पाहिजेत, यातील शंभर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या असतील. पन्नास अग्रगण्य (लिड) बँकेच्या असतील व इतर सर्व (स्टेट बँक व इतर बँका) यांच्या पन्नास असतील, तर गरजेपुरत्या शाखा होतील अशा रीतीने जिल्हा व तालुक्याची गावे

येथील पन्नास शाखा सोडल्या तरी इतर भागासाठी, दीडशे शाखा उरतात. म्हणजे साहजिकच दहा गावांना एक बँकिंगसेवा द्यावयाची म्हटले तर दहा ते पंधरा हजार लोकवस्तीला बँकिंगसेवा पुरविण्याचा प्रयत्न होतो यात. दहा गावांच्या विभागात सुमारे दोन ते अडीच हजार कुटुंबे असतील. या कुटुंबातील गरजू व कर्जयोग्य कुटुंबे फार तर पंधराशे असतील. या पंधराशे संभाव्य कर्जदारात शेतकरी, इतर व्यावसायिक, धंदेवाईक सगळचांचा समावेश असेल. प्रत्येक बँकेने करावयाचे हे जास्तीत जास्त पंधराशेपर्यंतचे प्रमाण ठरविले तर संपूर्णपणे, आवश्यक तेथे कर्जपुरवठा करण्यास फारशा अडचणी येणार नाहीत. तथापि त्यासाठी निश्चित स्वरूपाची योजना ठरविली पाहिजे. गावे निश्चित केली पाहिजेत. सेवाभावी व सेवातत्पर, कर्मचारी सतत मिळत गेले पाहिजेत. तसेच, शासनाच्या विविध योजना राबविल्या गेल्या पाहिजेत.

### शहरी कर्जपुरवठ्यावर बंधन

याचबरोबर धोरणात्मक बदलही आवश्यक आहे. ग्रामीण भागातील, बँकशाखेने पंधराशे कर्जदारांची योजना ठरविली तरी, त्यातील अत्यंत गरजू सुमारे दोनतृतियांश म्हणजे एक हजार असतील. यांतील निम्म्यांना जरी आपण पुरेशी मदत वेळेवर दिली, तरी ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कायापालट होईल. या पाचशे मंडळींना सरासरी हजार रुपये कर्जपुरवठा करावयाचा म्हटले तर दरशाखेस, सर्वसाधारणपणे पंचवीस लाख रुपये कर्जवाटप करावे लागेल. यातील निदान दशलाख, पाच वर्षांत ही दरशाखा ठेवी जमवील असे म्हटले तरी, प्रश्न अजून पंधरा लाखांचा उरतो. एवढे पंधरा लाख पाच वर्षांत शहरी भागाकडून ग्रामीण भागाकडे वळविणे भाग आहे. याचाच अर्थ आजच्या ठेवींच्या सर्वसाधारणपणे साठ टक्के कर्जे देण्याचे धोरण ग्रामीण भागात बदलावे लागेल व ग्रामीण भागासाठी, कमीअधिक प्रमाणात सर्वसाधारणपणे ठेवींच्या रकमेच्या अडीचपट रक्कम कर्जाऊ द्यावी लागेल. याला बागाइती व सधनभाग अपवाद असेल. तेथे कदाचित ठेवी कर्जापेक्षा जास्त असतील. ग्रामीण भागात ठेवींच्या रकमेच्या अडीचपट किंवा दुप्पट कर्जे देण्याचे सर्वसाधारण धोरण ठरविले तर साहजिकच बँकांना शहरी भागातील कर्जांचे प्रमाण खाली आणावे लागेल, जवळजवळ निम्मे करावे लागेल. याचाच अर्थ शहरातील श्रीमंतांना, ठोक व्यापाऱ्यांना, कमिशन एजंटांना कर्जे कमी करावी लागतील व अशी नवी कर्जे देणे बंद करावे लागेल. शेती या अर्थव्यवस्थेच्या आधारस्तंभाचा पुरेसा अर्थपुरवठा करण्यासाठी, आपल्याला हे करणे आवश्यक आहे. हे करीत असताना शासनाच्या ग्रामीण विकास योजना राबविल्या गेल्या पाहिजेत व तसेच नेतेमंडळींनी या गोष्टीसाठी सातत्याने प्रयत्न व पाठपुरावा केला पाहिजे.

या प्रकारे जर योजना आखली व कार्यवाहीत आणली तर बँकांना यश येईलच येईल, वेळ लागेल; पण येईल. दुष्काळ, अवेळी पाऊस या गोष्टी मध्ये आल्याने परतफेडीला उशीर होईल; पण त्यामुळे कर्ज बुडण्याचा धोका बाळगण्याचे कारण नाही. बँकांनी कर्ज दिल्याने समाजविकास साधेल, त्यातून, बँकिंगची सवय व परतफेडीची वृत्ती विकसित होईल; पण त्यासाठी वित्तीय संस्थांनी, शेती व शेतीपूरक व्यवसाय, दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन व इतर व्यवसाय करणारांना काळजीपूर्वक, पुरेसे वेळेवर सहाय्य करून पाठपुरावा केला पाहिजे. सर्वसाधारणपणे असे सर्रास बोलले जाते की, शेतीला पैसे दिले की ते बुडाले; पण हा एक तर अपप्रचार आहे किंवा ते आपले अपयश आहे. इतर व्यवसायांना दिलेली कर्जे थकत नाहीत, बुडत नाहीत असे थोडेच आहे? तसेच शेतीकर्जाचे. शेतीकर्जाच्या परतफेडीला बराच कालावधी लागतो. एवढेच म्हणता येईल; पण इतर व्यवसायांना दिलेली कर्जे ही वर्षानुवर्षे तशीच पुढे चालू ठेवण्यात येतात. फक्त व्याज भरून घेतले जाते, हीही परिस्थिती खरीच आहे. तेव्हा या गैरसमजाने आपण ग्रामीण भागात सुरू केलेल्या बँकिंगच्या कार्यात पूर्वग्रह बाळगण्याचे कारण नाही. आपण फक्त दीर्घकालचे हप्ते दिले पाहिजेत व त्यांचा निश्चित पाठपुरावा केला पाहिजे!

□


मान्यता पावलेला चरित्रग्रंथ

## टॉलस्टॉय – एक माणूस

दुसरी आवृत्ती । लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : पंचावन्न रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०

# वदलत्या कथा : [ ४ ]

# पाच सात ससे

वि. शं. पारगावकर

भाऊ कधी कधी फारच खुशीत दिसतात. मात्र खुशीत असले म्हणजे ते एखाद्या जोकरसारख्या उडया मारतात किंवा विचित्र हातवारे करतात असे नाही. त्यांच्या चेहऱ्यावर उत्साह ओतप्रोत दिसतो. त्यांच्या चालण्यात लक्षात येईल असा फरक पडतो. डोक्यावर रुमालाऐवजी काळी चेस्टरची टोपी येते आणि अंगावरचं उपरणं जाऊन तिथं जॅकिट येतं !

भाऊ नेहमी डोक्याला पांढरा रुमाल बांधतात. अंगात बिन कफकॉलरचा पांढरा सदरा, त्यावर बंद गळयाचा पांढऱ्याच रंगाचा पर्शियन कोट, उपरणं, पायात कोकणी जोडा आणि हातात मूठ वळविलेली काठी, हा त्यांचा ऑफिसमध्ये जाण्याचा पेहेराव असतो.

खुशीत असले म्हणजे त्यांच्या पायात कोकणी जोडयाऐवजी काळचा चपला असतात.

पण आईला मात्र त्यांचा ऑफिसमध्ये जाण्याचा पेहेरावच विशेष आवडतो. त्यांनी टोपी आणि जॅकिट घातलं की आईला का कोणास ठाऊक राग येतो. आईचा एक विशेष असतो. ती रागावली की गप्प असते. सारी कामं मुक्या–मुक्यानं करीत राहते. कोणाशी चकार शब्द बोलत नाही. एरवी तिचा स्वभाव फार बोलका आणि चेहरा हसरा आहे. तिला थट्टा–विनोदही करणं फार आवडतं. ती कोणाची थट्टा करते तेव्हा फार शोभून दिसते. विशेषत: भाऊंची थट्टा करते तेव्हा तर फारच. त्यामुळं सारं घर हसरं होतं. भाऊ एरवी गंभीर वाटतात तेही तेव्हा मिशातल्या मिशात हसत असतात.

आणि चहाचा एक कप मागून ते या साऱ्या प्रकरणाची सांगता करतात.

मग आईही हसत हसत भाऊंना चहा करून देते आणि आपल्या कामाला लागते.

आज सुटीचा दिवस होता. सुटीच्या दिवशी भाऊ फारच प्रसन्न असतात. सकाळी अंघोळ करताना ते कधीकधी गाणंदेखील गुणगुणतात. आईचं घरात चुलीपाशी काही तरी चाललेलं असतं. भाऊंच्या गुणगुणण्याचा आवाज आला की, आई विझल्यासारखी होते. तो तिच्यातला बदल मला तरी स्पष्ट दिसतो. माझ्या इतर धाकटया बहिणींना किंवा भावाला त्यातलं काही कळत नाही. त्यात नेमकं रहस्य काय आहे हे मलादेखील कळत नाही; पण इथं काही तरी आहे हे कळणं तरी काय थोडं झालं ? आपण भावंडांपेक्षा निश्चित प्रौढ आहोत याचा तेव्हा मला अभिमान वाटत असतो.

आणि मग उगीचच भावाला किंवा बहिणींना मी माझी काही कामं करायला सांगतो. ते ऐकत नाहीत. कारण ती फक्त आईची किंवा भाऊंची कामं ऐकतात ! त्यावरून माझा त्यांच्याशी वाद होतो. ते महामूर्ख आहेत हे मी त्यांना मग बजावून सांगतो. त्यांवर ती मला दिसणार नाही अशा बेताने स्वतःच्या जिभांची टोकं बाहेर काढून मला वेडावतात. एकाने वेडावलेलं माझ्या लक्षात आलं आणि मी त्याच्यावर डोळे मोठे केले की माझ्या पाठीमागे मुद्दाम उभी असलेली माझी परकरी बहीण जिभेचं टोक बाहेर काढून मला वेडावते. तिला वाटतं ते मला दिसत नाही ! तिचं वाटणं खरं असतं. मला ते दिसत नसतच मुळी; पण मला ते समजलेलं असतं. मग तसाच मागे मागे जात मी तिच्याजवळ पोहोचतो आणि उलटया हाताने तिच्या पाठीत एक धपका लगावतो. माझ्या बोटात अंगठी असते. तिचा मार तिला लागतो. माझीही ती इच्छा असतेच. मग ती भोकाड पसरते; पण मग मीच तिथून धूम पळून जातो !

आई स्वयंपाक घरातून ओरडते,

युद्धाची तयारी सुरू झाली वाटतं ?'

धाकटी बहीण एकदम रडायची थांबते. जणू ती आईनं असं काही बोलायचीच वाट पाहत असते. सगळीकडं चुपचाप होतं. अंगणात एक भलंमोठं डेरेदार लिंबाचं झाड आहे. त्यावर सकाळचे वेळी खूप निरनिराळे पक्षी येऊन बसतात. सारखा चिवचिवाट चाललेला असतो. मला हा चिवचिवाट फार आवडतो. पक्षी म्हणजे माझे आवडते प्राणी. मी बैठकीतल्या खिडकीशी उभा राहून झाडावरच्या पक्ष्यांचं निरीक्षण करीत उभा राहतो.

भाऊंची आंघोळ झालेली असते. मग ते गुलाबी कद नेसतात. आईनं केशराचं गंध उगाळून ठेवलेलं असतं. परडीत जास्वंदीची, गुलाबाची, कर्दळीची, जाई-जुईची फुलं भरून ठेवलेली असतात. सुटीच्या दिवशी भाऊ सायसंगीत पूजा करतात. देव लिंबाच्या फोडीने माखून घेतात, मग रांगोळीने घासतात. दूध, दही, मधाने त्यांना अभ्यंगस्नान घालतात. मग केशरी गंध लावतात. कापूर, उदबत्ती, फुलं– सारी मजाच असते. साऱ्या ओसरीभर सुवास दरवळत असतो.

भाऊंनी कपाळाला सुंदर गंध लावलेलं. कापूर–आरती, आरती झाल्यावर भाऊ घंटा खाली ठेवतात आणि उठून धोतर नेसू लागतात. सुटीच्या दिवशीचं त्यांचं धोतरही खूप स्वच्छ आणि गुलाबी पांढरं असतं.

मग भाऊ चहा पितात आणि बाहेर जायचे कपडे घालायला बैठकीत येतात. याच्या किती तरी अगोदर मी अभ्यासात गढून गेलेलो असतो. भाऊ केव्हा बैठकीत येणार ह्याची मला अगोदरपासूनच कल्पना येते. त्याप्रमाणे माझी अभ्यासाची तयारी सुरू होते. भाऊ बैठकीत येतात तेव्हा जणू काही मी तासापासून अभ्यासात गढलेलो आहे असा भास मी सहज निर्माण करू शकतो.

भाऊ बैठकीत कपडे घालायला आले तेव्हा आईच्या स्वयंपाकघरातून समोरच्या ओसरीवर चारपाच येरझाऱ्या झाल्या आणि जेव्हा भाऊंनी गुलाबी पाकळचांसारखं तांबूस रंगाचं धोतर सोडून ठेवलं नाही आणि सदऱ्यावर जाकीट चढविलं तेव्हा त्याची चाहूल स्वैपाकघरात आईला लागली. ती आतूनच ओरडली,

' ऐकलंत का ?'

भाऊंनी तिचं बोलणं ऐकलं असावं. कारण अभ्यासात व्यग्र असलेल्या मलासुद्धा ते ऐकू आलं, मग नुकतेच कपडे करीत असलेल्या भाऊंना ते का येऊ नये ! पण त्यांनी ऐकू आल्याचं काही दाखवलं नाही आणि आपले नीटनेटकेपणानं कपडे करीतच राहिले. आता काळचा जाकिटावरचा मळ ते ब्रशाने पुशीत होते. तेव्हा पहिल्यापेक्षा थोडचा मोठचा

आवाजात आई म्हणाली,

'अहो, मी काय म्हणते ते ऐकलंत का ?'

तेव्हा भाऊंनी प्रतिप्रश्न केला.

'काय म्हणताय ?'

'आज कुठं निघाला सकाळी सकाळी ?'

वास्तविक आईच्या विचारण्यावरून असं वाटत होतं की ते कुठं जाणार आहेत हे तिला कळलेलं आहे आणि त्यांनी तिकडे जाऊ नये अशी तिची इच्छा आहे !

'का तुमचं काही काम आहे वाटतं ?' त्यांनी उलट विचारलं.

'आज आता सुटी आहे, तेव्हा घरीच बसून रहावं मुलाबाळात ! बाहेर जाऊ नये आज !'

भाऊंसमोर पेच उभा राहिला असावा असं त्यांच्या चर्येवरून वाटू लागलं !

मग थोडा वेळ त्यांचे डोळे स्थिर दिसले. हालचाली जागचेजागीच थबकल्या. नंतर डोक्यात काही तरी विचार ठरल्याची चमक आली. मग ते अगदी सहज, शांत, संथ आवाजात आईला म्हणाले,

'बंडूला आज जरा बाहेर घेऊन जातो!'

बोलून झाल्यावर त्यांनी माझ्याकडे पाहिलं तेव्हा त्यांच्या डोळ्यांत मला मिस्किलतेची लकेर दिसली. मला हे सारं कसं समजतं याचं माझं मलाच आश्चर्य वाटलं. भाऊ म्हणजे एक छान वडील आहेत हे माझ्या सहजपणे लक्षात आलं. माझ्यातला एक विशेष असा आहे की मला एका वेळी लोकांच्या मनातल्या अनेक गोष्टी समजतात. मी कशावरून तरी आडाखे बांधतो आणि शेवटी ते खरे ठरतात; पण भाऊंच्या बाबतीत मात्र माझे अंदाज बरेच वेळा चुकतात. नंतर त्यांची कारणे मी शोधतो पण सापडतच नाहीत ती कारणे. शेवटी मी कंटाळतो आणि मनाची समजूत घालतो. ती म्हणजे भाऊ माझ्यापेक्षा किती तरी मोठे आहेत. शिवाय ते माझे वडील आहेत. असते बऱ्याच वेळा गूढता त्यांच्या बोलण्यात आणि वागण्यात !

आईच्या बाबतीत मात्र मग तसं का नाही हा प्रश्न मला पडतो. आता हेच पहा ना. आईचं आणि भाऊंचं आताच जे संभाषण झालं, त्यात आईचा रोख मला साराच्या सारा कळला होता. आंघोळ करताना आज भाऊ गाणं गुणगुणत होते ते आईला आवडलं नाही. का ते मला माहीत आहे. गाणं गुणगुणत त्यांनी आंघोळ केली की ते मुलायम, गुलाबाच्या पाकळ्या सारखं नवं धोतर नेसणार, परीटघडीचा पांढरा सदरा घालणार, त्यावर इस्त्रीचं जॅकिट चढविणार, रुमालाऐवजी काळी टोपी घालणार, कोकणी जोड्याऐवजी काळ्या चपला घालणार आणि हातात वाकड्या मुठीची काठी न घेताच मोठ्या लगबगीनं घराबाहेर पडणार !

हे सारं त्या वेळी आईच्या मनात आलेलं असणार आणि का कोणास ठाऊक हे सारं तिला नको असतं; पण ते सारं खरं ठरणार हे आईप्रमाणेच मलाही कळतं.

आणि आता ते खरं ठरलं होतं.

पण माझा एक अंदाज सपशेल चुकला. तो म्हणजे भाऊ म्हणाले, 'बंडूला आज जरा बाहेर घेऊन जातो !' भाऊ मला आपल्याबरोबर बाहेर नेणार याचा अंदाज त्यांच्या पूर्वीच्या हालचालीतून मला अजिबात आलेला नव्हता. हे सारं अनपेक्षितच होतं; पण तितकंच ते आनंददायीही होतं. भाऊंबरोबर मला बाहेर जायला फार आवडतं. तसं नाही म्हटलं तरी त्यांनी मला भाजी आणायला, क्वचित गोडं तेल आणायचं असलं तर किराण्याच्या दुकानात आणि आठवड्याच्या बाजारातही नेलेलं होतं. बाजारात आमच्यासाठी गुडदाणी, ऊस खरेदी केला होता.

आणि आज आता मला भाऊ कुठं तरी घेऊन जाणार होते. मला भयंकर आनंद झाला. उड्या मारीतच मी ओसरीवर गेलो. आनंदाच्या भरात सुनंदेच्या पाठीत एक धपका मारला. नानूला बारीक चिमटा काढला आणि आईसमोर जाऊन तिला म्हणालो,

'मला दूध दे लवकर ! मला भाऊंबरोबर बाहेर जायचंय !'

आई माझ्या चेहऱ्याकडे आणि आनंदाकडे पाहातच राहिली ! पण तिचा मात्र चेहरा काही बदलला नाही ! भाऊंनी तिच्या पुढ्यात जणू गुगली बॉंब टाकला होता !

मी दूध पिऊन बैठकीच्या खोलीत आलो होतो तेव्हा भाऊंचे कपडे करून झाले होते. भाऊ त्या ऐटबाज पेहेरावात फारच छान दिसत होते. माझ्याकडे पाहात ते म्हणाले,

'ए, गबाळ्या !'

भाऊंनी असं म्हटल्यावर मी माझ्या अंगावरच्या कपड्यांकडे पाहातच राहिलो. माझीही सकाळची अंघोळ झाली होती. जरी मी गाणं गुणगुणत ती केली नव्हती तरी स्वच्छ केली होती आणि धुतलेले ताजे कपडे अंगावर घातले होते. तसा मी ऐटबाज दिसत होतो. फक्त काजळ मात्र डोळ्यांत नव्हतं. कधी कधी आईला लहर आली किंवा तिला माझं विशेष कौतुक वाटलं की ती माझ्या डोळ्यांत काजळ घालीत असे. मला खरं म्हणजे ते मुळीच आवडत नसे; पण आई मात्र माझ्या रूपाकडे नंतर किती तरी वेळ पाहात राही आणि माझ्या बहिणी आणि भाऊ माझ्यावर चिडत. त्यामुळे काजळ घातलं की आपण सुंदर दिसतो असं माझ्याही मनात येऊन जाई.

म्हणून मग भाऊंना मी म्हटलं,

'कपडे तर चांगले आहेत माझ्या अंगात...' आणि पुढं मिस्किलपणे विचारलं,

'काजळ घालू का भाऊ डोळ्यांत ?'

'हं, हं ! काजळ घाला बरं डोळ्यात. कुक्कूबाळच की नाही तुम्ही ? एक तुमच्या आईसाहेब आणि दुसरे तुम्ही !'

मला भाऊंच्या बोलण्याचं हसू आलं आणि तेवढाच रागही आला. मला त्यांनी वेंगाडून नावं ठेवली तरी मला त्याचं काही वाटत नाही. उलट हसूच येतं; पण माझ्याबरोबर आईला कशाला वेंगाळायला पाहिजे ? आईला कोणी असं दूरान्वयानंही बोललेलं मला आवडत नसे. मी भाऊंना फणकाऱ्यात म्हटलं,

'हे काय हो भाऊ ? आई काय कुक्कूबाळ आहे वाटतं !'

भाऊनं माझ्या चेहऱ्याकडे पाहिलं आणि ते गोड हसले. तरी ते मनापासून हसले नसावेत असा मला संशय आला ! कुठं तरी भाऊ नक्कीच दुखावल्यासारखे वाटत होते. त्यांच्या काही तरी मनाविरुद्ध होत चाललेलं होतं असं कुणाच्याही सहज लक्षात येण्यासारखं होतं !

मग भाऊ म्हणाले,

'तुझ्या मुंजीतली चड्डी आणि सदरा काढ !'

'ती फ्लॅनेलची चड्डी आणि सिल्कचा सदरा ?'

'आणि जरीची जांभळी टोपी !'

'ती पुढे कृष्णाचा फोटो असलेली ?'

'हो आटोप लवकर !'

'पण आपल्याला कुठं जायचंय भाऊ ?'

'त्या चांभारचौकशा करू नकोस. आटोप म्हणजे आटोप–बस्स !'

भाऊ फार करारी आहेत. जितके दिलखुलास तितकेच रागीट !

माझी एकच धांदल उडाली. आई स्वैंपाक करीत होती, पण निदान दहा वेळा तरी तिच्याकडे जाऊन मी तिला भंडावलं. माझे कपडे सापडतच नव्हते. शेवटी हो–नाही करता करता मोठ्या ट्रंकेत सर्व सापडले. टोपीची गोल ऐट गेली होती आणि गांधी टोपीसारखी ती चपटी घडीची झाली होती. सदऱ्याला छप्पन्न चुण्या पडल्या होत्या. चड्डीला एक दोन बटणंच नव्हती ! परंतु मोठ्या उत्साहात दहा–पंधरा मिनिटात मी सारं ठीकठाक जमवून घेतलं.

कपडे घालून झाले तेव्हा तिन्ही भावंडं मला एकानंतर एक अशी तीन वेळा बावळट म्हणाली. मला त्यांचा राग आला. आई मात्र काही म्हणाली नाही आणि भाऊ म्हणाले,

'चल !'

आम्ही घराबाहेर पडलो तेव्हा आईचं आमच्याकडे बारीक लक्ष होतं असं लक्षात आलं. स्वैंपाकघराला समोरच्या भिंतीला एक भोक आहे. त्या भोकातून समोरच्या मोठ्या दारातून 'कोण आलं कोण गेलं' हे सर्व दिसतं. आईनंच ते पाडून घेतलं आहे. समोरच्या बठकीतलंदेखील सर्व काही त्या भोकातून दिसतं. म्हणजे थोडक्यात आईला चुलीपाशी बसल्या–बसल्या घरातील सर्व ठिकाणांवर नजर टाकता येते. फक्त तिला घराबाहेर काय चालतं हे दिसत नाही ! कळत नाही ! ते दिसावं आणि कळावं अशी आईची फार इच्छा असते आणि धडपडही असते !

आम्ही मोठ्या रस्त्याला लागलो आणि गजबजलेल्या सडकेवरून चालू लागलो. आपण कुठे चाललो हे मला काहीच माहीत नव्हतं. भाऊंच्या हातात पिशवीही नव्हती. नाही तर एरवी बाहेर पडले की भाऊ हातात पिशवी घेऊन बाहेर पडतात. मी त्यांना विचारलं,

'भाऊ ! तुमच्या हातात आज पिशवी कशी नाही ?'

माझ्या बोलण्याची भाऊंना चीड आल्यासारखे दिसले.

'पिशवी ? कसली पिशवी ? छीः !'

त्यांना हातात पिशवी असण्याची एवढी किळस का वाटावी हेच मला कळेना ! जाऊ द्या आपण काही बोलायचं नाही असं मी ठरविलं. मग मोठे रस्ते, गल्ल्या, मोठ्या गल्ल्या, बारके बोळ वगैरे ओलांडीत भाऊ एका दारासमोर येऊन थांबले. चहूकडून घरं आणि मध्येच ते दार होतं. गल्ली तिथंच बंद झाली होती. घर अगदी कोंदट होतं. त्यांनी दारावर थाप मारली. थोड्या वेळात आतून एका बाईचा आवाज आला,

आले, आलेऽऽ !'

आणि आवाजापाठोपाठच दार उघडलं गेलं !

दारात एक गोरीपान बाई उभी होती. भाऊंकडे पाहिल्याबरोबर ती सुरेख हसली. तिचे दात तर अगदी पांढरे पांढरे शुभ्र होते. काळ्या कुरळ्या केसांच्या मधलं तिचं गोरं कपाळ खूप रुंद आणि ठळक होतं. त्यावर कुंकू नव्हतं. कुंकवाच्या जागेवर हिरवं गोंदलेलं होतं. गोऱ्या कपाळावर ते हिरवं गोंदणं फार शोभून दिसत होतं. ती अस्मानी रंगाची साडी नेसलेली होती आणि अंगात पांढरा शुभ्र ब्लाऊज होता.

'या ! याचं नाव काय ?' माझ्याकडे पाहात त्या बाईनं विचारलं.

'बंडू ! माझा मुलगा.' भाऊंनी सांगितलं आणि आम्ही अंगणातून वरच्या सोप्याकडे निघालो. चालताना माझ्या मनात विचार आला की, या बाईला आमच्या घरची विशेष माहिती दिसत नव्हती ! फक्त भाऊंची आणि हिचीच ओळख असावी; पण पुरुषाची एखाद्या बाईशी स्वतंत्रपणे मैत्री-ओळख असू शकते काय ?

पण माझे विचार मध्येच तुटले. वरच्या ओसरीवर दोन-तीन जाळीचे मोठे पिंजरे होते आणि त्यात पांढरे शुभ्र, गुबगुबीत, लाल डोळ्यांचे छान छान ससे होते. मी एकदम तिकडे ओढला गेलो आणि क्षणापूर्वीचं सारं काही एकदम विसरून गेलो !

माझ्याकडे पाहात माझ्या खांद्यावर हात ठेवीत ती बाई म्हणाली,

'तुला आवडले ससे ?'

'खूपच !'

'मग बस इथंच त्यांच्याशी खेळत !'

तिनं एका पिंजऱ्याचं दार उघडलं आणि आतून दोन सशांच्या कानांना धरून त्यांना बाहेर काढलं. त्यांना माझ्यासमोर ठेवीत ती म्हणाली,

'चावत नाहीत ते. पळूनही जात नाहीत. तुला त्यांच्याबरोबर खेळायला खूप आवडेल! मी तुला आणि सशांना खायला आणून देते.'

आणि ती बाई आणि भाऊ दोघंही आतल्या दुसऱ्या खोलीत निघून गेले. मी त्यांच्याकडे पाहतच राहिलो ! घरात इतर मुलं किंवा पुरुषमाणूस कोणीच नव्हतं. मला हे कुठे तरी खटकलं.

पण ससे ग्रेटच होते ! मी त्यांच्या पाठीवरून प्रथम खूप वेळा हात फिरवला. मग त्यांच्या कानांना धरलं आणि वर उचललं. आपल्याला त्यांना वर उचलता येतं याचा खूप आनंद झाला.

तेवढ्यात त्या बाईनं मला खारका, बदाम, अंजीर आणि मनुका आणून दिल्या. त्याचीही मला गंमत वाटली. मी विचारलं,

'तुमचं नाव काय ?'

'मालती. पण तू मला मालतीकाकू म्हण!'

मला ते विचित्रच वाटलं. पण तिच्या गोड चेहऱ्या आणि हसण्यापुढं माझं वाटणं टिकलं नाही. तीही झटकन आत निघून गेली आणि मी सशांशी खेळत खारका, बदाम खात बसलो. सशांशी तर खपच खेळलो. त्यात खूपच वेळ गेला आणि मग भाऊंची जोरात आठवण आली. ते सारं घर परकं परकं वाटू लागलं.

मी झटकन उठलो आणि भाऊंना शोधण्यासाठी आत गेलो आणि पहातो तर भाऊ आणि मालतीकाकू पलंगावर बसून गप्पा मारीत होत्या.

मी कावराबावरा होऊन म्हटलं,

'भाऊ, मला घरी जायचंय !'

' जाऊ यात की. हा निघालोच !' म्हणत भाऊ उठले. त्यांनी माझ्या पाठीवर थोपटल्या. सारखं केलं आणि पायात चपला सरकवल्या- मालतीकाकूंकडे पाहून ते म्हणाले,

'येतो !'

'हूंऽऽ'

आणि आम्ही चालू लागलो. मग भाऊंनी मला मोठ्या बाजारात नेलं आणि किती दिवसांपासून मला घ्यावासा वाटत होता तो फ्लेक्सचा काळाभोर बूट त्यांनी मला विकत घेऊन दिला. मला त्याचा फार आनंद झाला. आम्ही घरी आलो तेव्हा जेवायची वेळ टळून गेली होती ताणि सर्वजण आमची वाट पाहत ताटकळून बसले होते.

मी मात्र हळूच आईकडे गेलो आणि फक्त तिलाच ऐकू येईल अशा आवाजात तिला म्हणालो,

'आता मी कध्धी कध्धी भाऊंबरोबर बाहेर जाणार नाही !'

आईनं माझ्याकडे पाहिलं आणि तिच्या डोळ्यांतून दोन अश्रूंचे थेंब ओघळले.

–आणि तेव्हा मला कळलं नाही की हे दुःखाचे अश्रू आहेत का आनंदाश्रू !

# पुस्तके

सुधीर जोगळेकर

# छंद माझे वेगळे

## आयुष्य उबगवाणं न करणारे मोहरलेले क्षण

मॅजेस्टिक बुक स्टॉलच्या केशव विष्णु कोठावळचांनी प्रकाशित केलेलं ' छंद माझे वेगळे ' हे पुस्तक ही एक अवर्णनीय आनंदाची लूट आहे, असंच म्हटलं पाहिजे. खरं तर तळेगावसारख्या आडगावात रहाणारा, आयुष्याची मौल्यवान १५–१६ वर्षे नर्मदा परिक्रमात आणि श्रीसंत गाडगेबाबांच्या सहवासात घालवणारा हा इसम, त्याच्याशी होणारी मैत्री, त्याच्यातून होणाऱ्या गप्पा आणि त्याच्या पुस्तकांचे वाचन हाच एक खरा आगळावेगळा छंद मानायला हवा.

खरं तर ' छंद माझे वेगळे ' हे नवनीत, महाराष्ट्र टाइम्स, स्वराज्य, रसिक, ललित, विवेक आणि तरुण भारतातल्याच लेखांचं संकलन. पुस्तकरूपानं हे संकलन प्रकाशित करताना आप्पांनी लिहिलंय, ' लहानपणी नाटकं पहात असताना एक पद कानांवरून गेलं होतं. ' अजुनि खुळा हा नाद पुरेसा कैसा होईना ।' पदाचा अर्थ त्या वेळेस फारसा कळला नव्हता. पण आयुष्यातली पंचावन्न; छप्पन्न वळणं नाना छंदांमागं पायांखाली न पाहता धावत ओलांडल्यानंतर आता तो अर्थ निसटता कळू लागला आहे.

आता शेवटपर्यंत हे छंद सुटतीलसं वाटत नाही. एक मात्र झालं. आयुष्यात बहुशः कधीच उबगवाणं वाटलं नाही. हा छंद, तो छंद, तो छंद असं स्वतःचं कौतुक पुरवीत राहिलो.

त्या छंदांसवे वाटचाल करीत असतानाचे हे काही मोहरलेले क्षण !

हे मोहरलेले क्षण ज्या तरल जाणीवेमधून; रसिक मनामधून आणि निसर्गाविषयीच्या आपुलकीतून साकारले, त्या क्षणांचा, त्या क्षणातून विकसित झालेल्या छंदांचा सुगंध आपल्यासारखाच दुसऱ्याच्याही जीवनाला स्पर्शून जावा यासाठी मृणाल आणि मधुरेला अर्पण केलेली अर्पणपत्रिका, अरुण घाटचांची मांडणी, वेगळ्या छंदांना बोलकं करणारे विलक्षण जिवंत मुखपृष्ठ आणि पुस्तकाच्या मधोमध 'सावलीदिवलीचा खेळ', ' बनफुलांच्या संगतीत ', ' मैल झाडझुडपांचे' दगडांचा देव, मी एक रत्नकार, ' उभे राहणारे छांदिष्ट अप्पा ही या संकलनाची आणखी काही वैशिष्टचे.

वारकरीप्रवृत्तीच्या, गळचात तुळशीमाळा धारण करणाऱ्या, मांसाशनाचा विलक्षण तिटकारा असणाऱ्या आणि कठोर शाकाहारी वृत्तीच्या आप्पांना शस्त्रसंग्रहाचे वेड कसे लागले त्यामागचे अनुभव सांगताना त्यांच्या संग्रहातल्या तलवारीची आठवण ते सांगून जातात.

'आप्पासाहेब मला रात्री साक्षात्कार झाला. माता भवानी म्हणाली, वत्सा, तुजप्रति कल्याण असो ! त्या दाढीवाल्या दांडेकरांकडली तलवार म्या तुजला दिल्ही ! दिल्ही !!" असे सांगणाऱ्या बाबासाहेब पुरंदऱ्यांचा आपल्या तलवारीवर डोळा कसा आहे, हे सांगत असतानाच बाबासाहेब पाण्यात देव घालून बसले असल्याचाही उल्लेख करतात आणि म्हणतात, " मलाही भगवान शंकरांचा साक्षात्कार झाला. स्वतः पशुपती माझ्या स्वप्नात आले आणि म्हणाले, भक्तश्रेष्ठा,'उदईक तुजकडे एक लबाड लुच्चा येईल. पत्नीच्या साक्षात्काराची कथा सांगेल आणि तलवार मागेल. त्याला ती अजिवात देऊ नकोस. माझी पत्नी काल रात्री माझे पायचेपीत होती, ती बाबाला साक्षात्कार घडवायला त्याच्या घरी जाईलच कशी ? "

पुराणवस्तूंच्या संशोधनाचेही आप्पांचे वेड असेच आहे. गेल्या शतकाच्या मध्याच्या सुमारास सिंधमध्ये रेल्वेरूळ टाकण्याचे काम सुरू होते. मधे एक टेकाड आले. ते उकरता खाली अद्भुत सापडू लागले. चित्रमय शिक्के, विटा, भांडीकुंडी, रांजण, मातीच्या मूर्ती असेच बरेच काही मोह–एं–जोदये, हडप्पा, चन्हु–दडो, नारु–जो–दडो ही उत्खनित अतिप्राचीन नगरे यातूनच निघाली. आप्पांनी या उत्खनित नगरांमधूनही बरेच काही मिळवले, मिळवून दिले.

आप्पांची इतर छंदाबरोबर या छंदाचीही वारंवार थट्टा होते. कराडच्या नदीकाठच्या कोटात या छंदासाठी वारंवार हिंडणाऱ्या आप्पांना त्यांचे मित्र सांगतात, 'आप्पा, कोयनेचे तीर धुंडाळू लागले की ते कवी हळूच आपल्या घरचे जुने फुटके पाटे आणि वरवंटे कोटावरून खाली सोडून देतात. आप्पा ते उचलतात, सातवाहनकालीन पाटेवरवंटे असे नाव देऊन त्यांना वाजत-गाजत तळेगावी घेऊन जातात.

पण एका खेपेस आप्पांना या वाळवंटात खरोखरीचाच सातवाहनकालीन पाटा सापडला. चौकशीअंती पुरातत्त्ववेत्त्यांनी सांगितलं

'आपणास सापडलेला पाटा प्राचीन आहे. त्यावर बौद्धधर्माचे चिन्ह त्रिरत्न कोरले आहे. त्यावरील मणीही अदमासे पंधराशे वर्षांपूर्वीचा आहे.'

आप्पा एवढं लिहून थांबत नाहीत. 'खुळ्या त्या नादाची' चेष्टा करणाऱ्यांची, थट्टाही ते अशीच हसतहसत करतात आणि लिहून जातात, 'माझे कराडास जाणे झाले की मी दर वेळी त्या स्थळाकडे डोकावतो. कुणास ठाऊक मला एखादे प्राचीन चिलखतही सापडायचे! माझ्या मित्रांच्या थट्टाविनोदापासून माझे रक्षण करण्यासाठी ते चिलखत अंगी असायची फार गरज आहे!'

दगडांच्या देशामध्ये बनफुलांची संगत शोधत झाडाझुडुपांमधून हिंडणारे आप्पा अत्तराचाही राजस छंद जोपासतात आणि अत्तरखरेदीला जाण्यासाठी करायच्या खास वेषाची, इत्रजनवाजाशी करायच्या आदाब-अर्जाची, नबाबी थाटाची, आपल्या दर्दीपणाची जाण कशी द्यावी याचं वाकबगारीनं वर्णनही करतात. अत्तरखरेदी उत्तम शराबीसारखी कशी चढत जाते याचंही वर्णन करतात आणि बालगंधर्वांच्या ऐन वैभवकाळातल्या, आठ–दहा वर्षांपूर्वीच्या श्रीमंत बाबुराव देशमुखांकडच्या वऱ्हाडी थाटाची अनुपमेय अत्तरविलेपनाची आठवण सांगतात.

पण या साऱ्यातूनही विलक्षणपणाने डोकावतो तो आप्पांच्या तालमीचा, गडकिल्ले भटकण्याचा छंद. हे सारे छंद या अशा छोटेखानी पुस्तिकेतून वाचत मिळवण्याचा आनंद मनाला पुरेसा समाधान देणारा नाही. राजमाची ते तोरणा आणि रायगड ते प्रतापगडापर्यंत पसरलेली शिवकालीन गडकिल्लेसृष्टी आपणाबरोबर फिरत पहाण्याचा रसाळ मिठ्ठास वाणीचा आनंद येत आप्पांच्या निकट रहाण्याचा, त्यांच्या तेवढ्याच निर्व्याज प्रेमाचा वाटेकरी होण्याचा आनंद ज्यांना अनुभवण्यास मिळाला ते खरे! आप्पांच्या छंदाची खरी ओळख त्या त्या अनुभवण्यातून आहे. *

'छंद माझे वेगळे'
गो. नी. दांडेकर
प्रकाशक : मॅजेस्टिक बुक स्टॉल
पृष्ठे : ९०, मूल्य : १२ रुपये,

## फिनिक्स निवड

# Wind In The Tower

(Mao Tse Tung and the Chinese Revolution 1949–1976)
Han Suyin
(Triad Panther, pages 476, £ 1=75)

डॉ. हॅन सुयीन, फेमिनाच्या संपादिका विमला पाटील, श्री. नानी पालखीवाला बेनेट अ‍ॅन्ड कोलमनचे जनरल मॅनेजर श्री. राम एस्. तरनेजा ही सर्व थोर मंडळी इतर काही कमी-अधिक थोर मंडळींबरोबर ११ किंवा १२ ऑगस्ट १९७७ रोजी मुंबईत एकत्र जमली होती. प्रसंग होता इलस्ट्रेटेड विकली ऑफ इंडिया व फेमिना यांनी भरवलेली मिटिंग.

डॉ. हॅन सुयीन त्या वेळी काय म्हणाल्या माहीत आहे तुम्हाला? या मिटिंगमध्ये त्यांनी असे वक्तव्य केले होते की, भारत व चीन या देशांनी कधीही आपआपल्या देशांच्या सीमारेषा आखल्या नव्हत्या. शतकानुशतके हे दोन देश शांततेने नांदत होते. या मिटिंगमध्ये त्या पुढे असेही म्हणाल्या होत्या की, सीमारेषा आखल्या गेल्या त्या ब्रिटिशांच्या राज्यात. मॅकमोहन रेषा वगैरे. आता नावावरूनच बघा. ते ब्रिटिशांचेच काम!

दोन देश वर्षानुवर्षे एकमेकांशेजारी इतक्या सौख्याने नांदले की त्यांच्यात सीमारेषा आखण्याचीही निकड भासू नये हे वाचून मला आश्चर्यच वाटले होते. परंतु थोडा खोल विचार केला की, डॉ. सुयीन यांचे म्हणणे पटले. इतिहासकालीन भारतीय संस्कृती जशी थोर व परिपक्व होती तशीच चीनची संस्कृतीही त्या वेळेला विकसित व तत्त्वज्ञानाच्या पार्श्वभूमीला धरून होती. तत्त्वज्ञानाच्या आश्रयास माणूस जेव्हा जातो तेव्हा तो भांडण्याच्या भानगडीत पडत नाही. Live and let live या म्हणीप्रमाणे तो वागतो. प्रत्येक जीवाला जगण्याचा एक मूलभूत हक्क आहे या तत्त्वावर तो आपले व्यक्तिमत्त्व उभारतो.

ब्रिटिश भारतात आले मात्र व त्यांनी आपल्या divide and rule या तत्त्वाने उपखंड पेटवून दिला. त्याचे निखारे अजूनही धगधगत आहेत.

शेकडो वर्षे शांततेने राहून नंतर एखादा देश जवळच्या देशावर एकाएकी हल्ला का करतो याचे गूढ मला काही केल्या उमगेना. जगातील बहुतेक पापांना मी औद्योगीकरण व विज्ञानाची प्रगती यालाच जबाबदार धरीन. अर्थात् विज्ञानाला जन्म देणारा माणूस, त्यानेच जर विज्ञान नीट वापरले नाही तर विज्ञानाचा काय दोष वगैरे सर्व कळते. परंतु ढोबळ रीतीने म्हणताना विज्ञानालाच दोषी ठरवावे लागेल. विज्ञानामुळेच माल्थस खोटा ठरला, विज्ञानामुळेच माणसाचे आयुर्मान व अपेक्षा बेसुमार वाढल्या. तो लोभी बनला व दुसऱ्याच्या टेरीटोरियल 'इंपीरीटीव्ह'वर तो हल्ला करू लागला.

एडगर स्नो हा नं. १ चा चायनावॉचर किंवा सीनोलॉजिस्ट समजला जात असे. मला वाटते डॉ. हॅन सुयीनला नंबर २ देण्यास हरकत नसावी. कारण तिची पुस्तके एडगर स्नो च्या 'रेड स्टार ओव्हर चायना' व 'अदर साईड ऑफ द रीव्हर'.इतकीच अभ्यासाधारित आहेत. डॉ. सुयीन यांची पुस्तके जरी अभ्यासाधारित असली तरी ती एडगर स्नो इतकी objective व detached नाहीत. डॉ. हॅन सुयीन या चीनशी भावनिकरीत्या गुरफटलेल्या आहेत. अभ्यासाधारित चरित्रात्मक ग्रंथ लिहिताना चरित्रकार जर तटस्थ राहिला नाही तर त्या चरित्राचे बरेच मूल्य कमी होते. चरित्र वाचताना एका गोष्टीचे विशेष भान ठेवावे लागते ते हे की, ज्याचे चरित्र लिहिले जाते तो काही परिपूर्ण देवमाणूस नसतो. माणूस या नात्याने त्याच्यातही दोष असतातच. पण या त्रुटींना चरित्रकारांनी एक प्रकारची endearing quality लावून दिली की, मग ते चरित्र वेगवेगळ्या इंद्रधनुष्याच्या रंगांनी उठून दिसते. म्हणजे ज्याचे चरित्र लिहायचे त्याचा उदो उदो न करता जर त्या व्यक्तीच्या failings ला एक प्रकारचा human touch दिला की चरित्रकाराचे निम्मे काम झाले.

डॉ. हॅन सुयीन जरी चीनच्या प्रेमात पडल्या असल्या तरी माओबद्दल लिहिताना

त्यांनी एक प्रकारची अलिप्तता दाखवली आहे. कधी थंड विश्लेषण केले आहे तर कधी मत ठरवण्याचे काम माहिती व आकडेवारी देऊन वाचकावर सोपवले आहे. उत्तम चरित्र लिहिण्याच्या तंत्रात त्यांची शैली निश्चितच बसते. उत्तम चरित्र लिहिण्याची शैली अशीच झुकांडी देणारी (elusive) असते. ही शैली एकाच तंत्राचा फार वेळ अवलंब करीत नाही. कधी विधायक टीका तर कधी स्तुती, कधी केवळ माहिती तर कधी चरित्र लिहिणाऱ्याची मते, कधी जनसामान्यांची मते तर खुद्द ज्यांचे चरित्र लिहिले जात आहे त्यांची मते, कधी No तर कधी Comments, अशा अनेक तंत्रांनी चरित्र लिहिले की ते वाचनीय होते असे निदान मला तरी आमच्या वाचनालयात आढळून आले आहे. चरित्र लिहिण्याबद्दलचे निकष आत्मचरित्रात्मक लिखाणालाही लागू पडतील असे मला वाटते. एकाच चरित्रकाराने त्याच व्यक्तीची दोन चरित्रे लिहिली आहेत ही किमया डॉ. हॅन सुयीन यांच्याखेरीज कुणीही साधली नसेल. डॉ. सुयीन चीनबद्दल attached तर माओबद्दल detached राहिले आहेत.

डॉ. हॅन सुयीन यांनी The Morniag Deluge' हे द्विखंडात्मक माओ त्से तुंगचे दुसरे चरित्र लिहिले आहे. सदरच्या पुस्तकात चरित्रात्मक माहितीपेक्षा इतर माहिती भरपूर आहे म्हणून ते चरित्रात मावणार नाही असा वाद कदाचित जाणकार घालतील. तर मग या जाणकारांना मी सदरच्या पुस्तकाच्या मागच्या बाजूला Biography असे केलेले वर्गीकरण दाखवीन.

आपण ज्यांना 'जाणकार' 'जाणकार' म्हणतो ते खरेच तेवढे नॉलेजेबल नसतात. कधी कधी हे जाणकार एखाद्या शब्दाच्या उच्चाराविषयी इतका वाद घालतात की पळता पळता त्यांची त्यांनाच भुई थोडी होते. माणूस या प्राण्याला शिकण्यासाठी उभी हयात पुरत नाही. त्यामुळे या जगात तसा 'परफेक्ट' जाणकार कुणीच नसतो. उदाहरणार्थ चित्रकार व्हिन्सेन्ट व्हॅन गॉग होता, खोग होता का गोख होता (काही म्हणतात तो खोकच होता!). असल्या वादात हे जाणकार इतक्या त्वेषाने उतरतात की त्यांची सर्व शक्तीच तिकडे खर्ची पडते. मग आपण त्यांना जाणकार का म्हणावे? "Spirit, rather than the letter of the law is important" हे वाक्य कायद्यासह सर्व क्षेत्रात तेवढेच लागू आहे व्यक्तीचे नाव हे निश्चितच महत्त्वाचे आहे; पण एका देशातील साध्या वाचकाच्या दुसऱ्या देशातील व्यक्तींची नावे उच्चारताना अगर लिहिताना चुका निश्चितच होणार.

क्रुश्चेव्हचे पतन का झाले याचे चिनी लोकांनी एका वाक्यात विश्लेषण कसे केले? "क्रुश्चेव्हने इतिहासाची आगेकूच रोखण्याचा प्रयत्न केला म्हणून तो पडला."

चीन व माओवरचे हे पुस्तक वाचून डॉ. हॅन सुयीनचे माओवरचेच दुसरे चरित्र विकत घेण्याचे मी ठरवून टाकले आहे.

—जे. एन्. पोंडा


## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | | रुपये |
|---|---|---|
| १. दिव्य (राजकीय लेख) : पु. रा. बेहरे | | १२/– |
| २. शरद-हास्य । (प्रश्नोत्तरे) : शरद तळवलकर | | १५/– |
| ३. खेळांचा राजा लॉन टेनिस : र. गो. सरदेसाई | | २०/– |
| ४. बिकट मार्गे मधुर स्वर्ग : (कादंबरी) : नयना आचार्य | | २४/– |
| ५. सायली : (कथासंग्रह) ज्योत्स्ना देवधर | | १८/– |
| 1. Science Is not Enough : ( Philosophy & Ecology· Vannevar Bush) | | |
| 2. Wise Guys : Bestseller : (Novel about the Mafia ) : Teresa Vincent ) | | |
| 3. Cricket Rebel : (Autobiography) : John Snow | | 60/– |
| 4. The Sinkiaag Executive : (Thriller) : Adam Hall | | |
| 5. Nijinsky : (Biography of the greatest male ballet dancer) : Richard Buckle | | |

* "I find that the only thing that really stands up, better than gambling, better than booze, better than women, is reading."

—Mario Puzo

दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

# रंगभूमी

विनया खडपेकर

# अक्षय कुरुक्षेत्र

## विस्कळित लेखन, सुमार प्रयोग

सत्तेचे खेळ अनादिकालापासून चालू आहेत आणि अनंत काळपर्यंत चालू राहणार आहेत. राजाराणीच्या बालबोध गोष्टीपासून रामायण-महाभारतासारख्या महाकाव्यांपर्यंत सर्वांत सत्ता-संघर्ष या विषयाचे दर्शन होते. शेक्सपियर, टॉलस्टॉय यांच्यासारख्या जगद्विख्यात प्रतिभावंतांनी तसेच त्र्यं. वि. सरदेशमुख, अरुण साधू या मराठीतील अगदी आजच्या लेखकांनी आपापल्या शक्तीनुसार या विषयाचा वेध घेतला आहे. स्त्री-पुरुष-प्रेमासारखाच 'सत्तेचा संघर्ष' हा एक चित्त वेधक, कधी विचार करायला लावणारा तर कधी मनःस्ताप देणारा, अनेकदा मनोरंजन करणारा असा समाजातला आणि साहित्यातला चिरंतन विषय आहे. म्हणून 'कुरुक्षेत्र' हे 'अक्षय' आहे– हे "अक्षय कुरुक्षेत्र" दाखविण्याचा प्रयत्न श्री. मानसिंग पवार यांनी आपल्या नाटकात केला आहे.

म्हातारा राजा विकल्प हा पुरूरवा या राजाच्या कैदेत असतो. भविष्याप्रमाणे, एक पक्षी कोणा तरुणाचा डोळा मिळण्याच्या मोबदल्यात पुरूरव्याचा नाश करणार असतो. जयदेव हा तरुण शिल्पकार जेव्हा त्याच तुरुंगात दाखल होतो तेव्हा विकल्प त्याला डोळा देण्यासाठी तयार करतो. राज्य नंतर आपल्याला मिळावे असे वचन विकल्पाकडून घेऊन जयदेव पक्ष्याला डोळा देतो. पक्षी येऊन पुरूरव्याला घायाळ करतो. नव्या राज्यात विकल्पच सिंहासनावर बसतो. जयदेवाला कलेची साधना करण्याचा उपदेश केला जातो. सैन्यात फाटाफूट होऊन सत्ता पुरूरव्याकडे जाते. असे आहे हे कथानक आणि त्यातील घटना.

त्यात अनेक दोष आहेत. सत्तेच्या लोभाने डोळ्याचे दान करणारा जयदेव विकल्पाला त्या वचनाची आठवण का व कशी देत नाही ? जयदेव विकल्पाच्या ताटाखालचे मांजर-का होतो ते कळत नाही. जयदेवाच्या मागे एक प्रेमप्रकरण चिकटवून काय साधले आहे ? त्या प्रेमप्रकरणामुळे जयदेवाच्या कोणत्या वृत्तीवर प्रकाश पडला आहे किंवा एकूण राजकारणावर तरी कोणता परिणाम घडला आहे ? सगळे प्रसंग यामुळे बिनबुडाचे वाटतात. पक्षी; भविष्य हे प्रकरण अद्भुत पातळीवर जाते. बाकी सर्व माणसे, कथानक ही वास्तव पातळीवरची आहेत. यामुळे नाटकाला एक पट्टी किंवा सूर (tone) येत नाही. नाटकाचा विषयच त्यामुळे विस्कळित, विस्कटलेला असा वाटतो. राजांची नावे हिंदु आणि पोषाख मात्र ग्रीकांसारखे हा आणखी एक दोष.

'सत्ता–संघर्षासारखा' नित्य आव्हानात्मक विषय ! तो थोडाफार सुव्यवस्थित मांडला तरी त्यानं आकर्षून घ्यावं अशी आपली भोवतालची आजची परिस्थिती ! परंतु त्याची हाताळणी अगदीच ढोबळ आणि विस्कळित झाल्यामुळे त्याने कोणताही प्रभावी परिणाम साधला नाही.

नाटकाचा प्रयोगही सुमारच होतो. अधिकारी, सेवक यांचे पोषाख योग्य होते. मागच्या पडद्यांनी राजवाडा, तुरुंग यांचा परिणाम ठीक साधला होता. विशेष उल्लेख करावा असा अभिनय कोणाचाही नव्हता. 'संकल्प' निर्मित श्री. विनायक पडवळ यांनी दिग्दर्शित केलेल्या या नाटकात श्री. सुहास पळशीकर (राजा विकल्प), श्री. मधुकर दांडेकर श्री. शेखर कांदळगावकर (अधिकारी) संतोष करमरकर, सतीश जाधव, मंगेश बाणे, अरुण घाडीगावकर (रक्षक) विलास खवळे (जयदेव), मिलिंद बेडेकर (पुरूरवा), अरुण गोंदरकर (पक्षी) श्रीराम दाते (विदूषक), मिलिंद चौधरी (सेनापती) सत्यजित फाटक (सैनिक), निवेदिता जोशी (विशाखा), सतीश खानविलकर (प्रजाजन), प्रदीप नरवणे (राजदूत) यांनी भूमिका केल्या होत्या. या नाटकाचा प्रयोग ९ फेब्रुवारी या दिवशी रात्री साडेआठ वाजता रवींद्र नाट्यमंदिर येथे झाला.

गेल्या वर्षी 'संकल्प' ने पु. शि. रेग्यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या दोन नाटिका सादर केल्या होत्या. अगदी वेगळ्या प्रकृतीच्या त्या नाटिका श्री. विनायक पडवळ यांच्या दिग्दर्शनाने बऱ्याच प्रमाणात यशस्वीपणे सादर केल्या होत्या. त्यामुळे श्री. विनायक पडवळ यांनीच दिग्दर्शित केलेले राज्यनाट्यस्पर्धेच्या पहिल्या फेरीत तिसरे पारितोषिकविजेते, संकल्पचे 'अक्षय कुरुक्षेत्र' पहायला जाताना चांगले नाटक पहायला मिळेल अशी आशा होती. ती अगदीच फोल ठरली. □

चित्रपट । सदानंद बोरसे

# जावयाची जात
# ❋ खूबसूरत

## एक तौलनिक अभ्यास

पुण्याच्या रुपेरी पडद्यावर काही दिवसांच्या अंतराने दोन सुना ( पैकी एक झालेली आणि एक होऊ घातलेली ) दाखल झाल्या– त्यांच्या ' जावयाची जात ' व खूबसूरत या चित्रपटामधून झालेल्या आगमनानिमित्त या दोन चित्रपटांचा अनेक अभ्यासूंनी व तज्ज्ञांनी केलेला तौलनिक अभ्यास आणि काही निष्कर्ष पुढे सादर करीत आहे.

संख्यात्मक तुलना–निरीक्षण–' जावयाची जात ' या चित्रपटाच्या ' जावयाची जात ' या नावात सहा अक्षरे तर ' खूबसूरत ' या चित्रपटाच्या ' खूबसूरत ' या नावात पाच अक्षरे आहेत. निष्कर्ष–' जावयाची जात ' या नावामध्ये ' खूबसूरत ' या नावापेक्षा एक अक्षर जास्त आहे.

तर चित्रपटाच्या नावापासून ते नायिकांच्या ' मापां ' पर्यंत ( किंवा आडमापांपर्यंत ) अनेक महत्त्वपूर्ण निष्कर्ष संख्याशास्त्रज्ञांनी काढलेले आहेत; पण या नीरस आकडेवारीला फाटा देऊन आपण इतर तुलनेकडे वळू.

कथानिरीक्षण–' जावयाची जात ' च्या कथेमध्ये एक पुणेरी तरुणी सासरी म्हणजे कोल्हापूरला जाते आणि तिच्या अंगातील ताठा, डोक्यातील स्त्रीमुक्तीचे, समान हक्काचे खूळ नवरा काढून टाकतो. ती एकदम आदर्श भारतीय पतिव्रता नारी वगैरे बनते. या उलट ' खूबसूरत ' मध्ये एक मुंबैकरीण छोकरी आपल्या भावी सासुरवाडीला म्हणजे पुण्याला येते आणि घरापासून घरवाल्यापर्यंत साऱ्यांचा चेहरामोहरा पार बदलून म्हणजे सुधारून टाकते.

निष्कर्ष–दोन्ही कथांमध्ये सुधारण्याची जिम्मेदारी पुणेकरांवर टाकून सुधरविण्याची मक्तेदारी बिगरपुणेरी लोकांकडे सोपवल्याने पुणेकरांना छान ठोकून घेतले आहे. त्यातही ' जावयाची जात ' मध्ये पुणेरी, कोल्हापुरी, त्यातून मराठी असा योग जुळून आल्याने काही फटके अगदी पुणेरी जोडयाचे, काही कोल्हापुरी चपलेचे तर काही ठिकाणी मस्त धोबीपछाड अशी सतत हाणामारी चालते. दोन्ही कथांची हाताळणी विनोदी वळणाची असल्याने या जोडयांना वा चपलांना शालजोडीचे आवरणही मिळाले आहे. नाविन्यहीन मध्यवर्ती कल्पना हे दोन्ही कथांचे (अन्य अनेक चित्रपटांप्रमाणे ) न-वैशिष्टच-जावयाची जात ' मध्ये एक बेचारा, पहचान, हमजोरी असे कैक चित्रपट एकवटले आहेत; हृषिकेश मुकर्जींनी आपलाच ' बावर्ची 'थोडाफार बदल करून आणि त्याला स्त्रीवेश देऊन ' खूबसूरत ' मधून पुन्हा पेश केला आहे. याशिवाय सर्व भावभावनांची तळी एकत्र केल्याशिवाय ' आबालवृद्धांनी एकत्र बसून पहावा ' असे चित्रतीर्थ तयार होत नसल्यामुळे तीही खबरदारी दोन्ही चित्रपटांमध्ये घेतली आहे. उदा० मोठयांचा आदर, वटसावित्रीचे व्रत, नऊवारीचे महात्म्य इत्यादी ( संदर्भ–जावयाची जात ) आजारपणात दिवसातील अठ्ठावीस तास जागे राहून केलेली आजाऱ्याची शुश्रूषा ( संदर्भ–खूबसूरत ) ' जावयाची जात ' मध्ये नायिकेच्या धाकटया बहिणीचे प्रेमप्रकरण अशी आणखी एक भर कथेत आहे. ' खूबसूरत ' मधील नायिकेची थोरली बहीण अगोदरच लग्न करून बसल्याने त्यात असा भरीचा चान्स मिळाला नाही.

दिग्दर्शन–' जावयाची जात ' चे दिग्दर्शक आहेत कमलाकर तोरणे तर ' खूबसूरतचे ' दिग्दर्शक हृशीकेश मुकर्जी. जवळ असलेला कसाही माल गिऱ्हाइकाला आकर्षून घेईल अशा तऱ्हेने मांडणे आणि आपली फसवणूक झाल्याचा संशय गिऱ्हाइकाला येऊ न देता तो त्याच्या गळयात मारणे यासाठी जे खास धंदेवाईक कसब आणि सराव लागतो तो दोघांजवळ भरपूर असल्याचे दोघांच्याही दिग्दर्शनातून जाणवते. कमलाकर तोरण्यांच्या काही ठिकाणी बारीक चुका झाल्या. उदा० नायिका सुजाता ( पद्मा चव्हाण ) मैत्रिणींबरोबर ट्रिपला गेलेली. ट्रिपला सगळयांचे ' हे गुलाबी, हे शराबी चित्र पाहू' वगैरे गाणे म्हणून होते. ट्रिपहून परतताना मात्र तोरण्यांनी सुजाताच्या मैत्रिणींपैकी एकीची वस्त्रेप्रावरणे ( निळी साडी व निळा ब्लाऊज ) कायम ठेवून आतली मुलगी बदलण्याचे जे बिनतोड कसब दाखवले ते अनाकलनीयच ! कलाकारांची यथार्थ निवड आणि मोक्याच्या जागा पकडण्याची दोन्ही दिग्दर्शकांची सफाईही त्यांच्या आधी उल्लेखलेल्या कसबाचा व सरावाचाच भाग. कल्पनागीत ही जुनाट युक्ती दोघांनीही वापरलेली.

कलाकार – दोन्ही चित्रपटांतील सगळया प्रमुख कलाकारांचा अभिनय दोन्हीची मोठी जमेची बाजू. काही अपवाद ' जावयाची जात 'मध्ये पद्माबाईंच्या अभिनयाबद्दल फारसा आक्षेप नाही; पण चित्रपटाच्या सुरुवातीला त्यांना कॉलेजतरुणी म्हणून स्वीकारणे जरा जडच गेले. त्याचप्रमाणे सरला येवलेकरला उगाचच जवळजवळ एकतृतीयांश वेळ नऊवारी साडीत दाखविण्याचे कारण काय ? कदाचित त्यातून तिचे साधेभोळेपण वगैरे दाखविण्याचे दिग्दर्शन असेल. ' खूबसूरत'मध्येही विशेषत: रेखा, अशोककुमार व दीना पाठक भन्नाटच. फक्त जगनची भूमिका केलेला रणजित चौधरी आपल्या अतिस्पष्ट आणि साचेबद्ध (त्याच्या आधीच्या चित्रपटांमधून–' खट्टा–मीठा ' व ' बातोंबातों में ' त्याचा हाच साचा दिसून आला. बोलण्यामुळे छळतो. गीतसंगीत–' जावयाची जात 'चे गीतकार जगदीश खेबुडकर. संगीतकार प्रभाकर जोग. चित्रपटातील सर्वच गीते सुरेख उतरली असली तरी ' स्वप्नात चांदण्याच्या जणू पौर्णिमा दिसावी, होऊन आज राधा माझी प्रिया हसावी ' हे द्वंद्वगीत फारच सुरेख. ' खूबसूरत 'चे गीतकार व संगीतकार अनुक्रमे गुलजार व राहुलदेव बर्मन आहेत, एवढच त्याबद्दल लिहिण्यासारखे. दोन्ही चित्रपटांच्या बाबतीत शवटचे निरीक्षण – तेच ते अन् तेच ते. (' जावयाची जात'मध्ये थोडे कमी.) आणि शेवटचा निष्कर्ष – एक छोटी दाबून टाकलेली जांभई ( 'जावयाची जात'साठी) आणि एक मो ऽऽ ठी स-आळस जांभई (अर्थातच ' खूबसूरत 'साठी!)

❋

## इंदिरा-संजय राजवटीचे पहिले पस्तीस दिवस : पृष्ठ ३ वरून

करू या. आणीबाणीत काही चुका अधिकाऱ्यांच्या अतिउत्साहामुळे झाल्या असल्या तरी त्यांची पुनरावृत्ती आम्ही होऊ देणार नाही. लोकशाहीवर आमची पूर्ण निष्ठा आहे ", असं इंदिरा गांधी आणि त्यांच्या नंतर त्यांच्या पाठोपाठ विविध मंत्री आणि कॉंग्रेस (आय)चे नेते सांगत राहिले. त्यांच्यावर अविश्वास दाखवायचं काहीच कारण नव्हतं.

असंच एक आश्वासन इंदिरा गांधींनी बहुमत मिळाल्याबरोबर दिलं होतं. " आमचं सरकार सध्याचे कुठलेली खटले काढून घेणार नाही. खास न्यायालयं रद्द करण्याचा आमचा विचार नाही ", असं त्यांनी सांगितलं होतं. पण बाईंना खास न्यायालयं रद्द करावी लागलीच नाहीत. खास न्यायालयांनीच स्वहस्ते स्वतःचं विसर्जन करून घेतलं.

इंदिरा-सरकार सत्तेवर आल्याच्या दुसऱ्या दिवशी, १५ जानेवारीला खास न्यायालय क्रमांक २ चे न्या. मांगीलाल जैन यांनी 'मारुती' प्रकरणात निकाल देताना खास न्यायालयाची स्थापनाच अवैध ठरवली. संजयच्या मारुती मोटार प्रकल्पाबद्दल संसदेत विचारल्या गेलेल्या प्रश्नांच्या उत्तरासाठी माहिती जमविणाऱ्या उद्योगखात्याच्या चार अधिकाऱ्यांचा छळ केला, असा आरोप इंदिरा गांधी, सी. बी. आय. चे माजी संचालक डी. सेन, इंदिरा गांधींचे माजी अतिरिक्त खासगी सचीव आर. के. धवन हे या खटल्यातले मुख्य आरोपी होते. या आरोपींनी खास न्यायालयाच्या स्थापनेला आव्हान देणारा अर्ज पूर्वीच केला होता; पण निवडणुकीच्या काळात त्याची सुनावणी लंबित लांबत अखेर सत्तांतरानंतर त्याचा निकाल खास न्यायाधिशांनी दिला. हा खटलाच आपल्या कक्षेत येत नाही, असा शेरा मारून न्या. जैन यांनी तो रद्द ठरवला. सर्वोच्च न्यायालयानं आदेश दिलाच तर तो चालवण्यासाठी पुन्हा त्यांनी मुख्य महानगर न्यायाधिशांकडे पाठवला.

खास न्यायालय क्रमांक १ चे न्या० मोहिंदरसिंग जोशी यांनीही १८ फेब्रुवारीला जीप भ्रष्टाचार प्रकरणात असाच निकाल देऊन आपल्या न्यायालयाची स्थापना बेकायदेशीर, घटनाबाह्य ठरवली.

अशा प्रकारे जवळजवळ दीड-दोन वर्षं बेकायदेशीर न्यायालयांचं काम कायदेशीरपणे पाहण्याचं कार्य या दोन तज्ज्ञ न्यायाधिशांनी केलं आणि अखेर ही न्यायालयं इतिहासजमा करून एका इतिहासाची नोंद केली.

छोट्या-मोठ्या न्यायालयांनी अशा अनेक खटल्यांचे निकाल एव्हाना दिले आहेत. संजय, विद्याचरण शुक्ला, बन्सीलाल, त्यांचे चिरंजीव सुरिंदरसिंग अशी अनेक मंडळी खटल्यांमधून मुक्त झाली आहेत. खासदार–आमदार अशा प्रतिष्ठेची ही मंडळी एक एक खटल्यातून दोषमुक्त व्हायला लागली आहेत आणि काही दोषमुक्तांवरचा 'अन्याय दूर करण्यासाठी' त्यांना पुन्हा विविध पदांवर आणलं जात आहे.

दिल्लीचे माजी पोलीस उपमहानिरीक्षक पी. एस. भिंदर हे अशा पुनरागमनाचे पहिले मानकरी ठरले. न्या० मांगीलाल जैन यांनी मारुती खटल्याबरोबरच भीमसेन साचार खटलाही रद्द केला. त्यात इंदिरा गांधी आणि धवन यांच्याबरोबर हे प्रीतमसिंग भिंदर आरोपी होते. ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक भीमसेन साचार यांच्यासह सात जणांना बेकायदेशीरपणे स्थानबद्धतेत ठेवल्याचा आरोप या तिघांवर होता. न्या० जैन यांनी खटला रद्द करून सर्वांना मुक्त केलं. १५ जानेवारीला हा निकाल लागला आणि २५ जानेवारीला भिंदर यांचं पुनरागमन झालं. दिल्लीच्या पोलीस आयुक्तपदी त्यांची नियुक्ती झैलसिंगांनी केली.

त्यांच्या आधी जे. एन. चतुर्वेदी पोलीस आयुक्त होते. ते 'चरणसिंगांचा माणूस' मानले जायचे. दिल्लीतल्या वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यात ते अयशस्वी ठरले, असं सांगून झैलसिंगांनी त्यांना बाजला केलं आणि त्यांच्या जागी भिंदर यांची नियुक्ती केली.

### भिंदर व जगमोहन

भिंदर म्हटलं की डाकू सुंदर खून खटला आठवतो. आणीबाणीत कुप्रसिद्ध डाकू सुंदरला कैदेत असताना ठार मारलं गेलं होतं. या प्रकरणीच्या खटल्यात भिंदर हे मुख्य आरोपी होती. सुंदरला ठार मारण्याचं सर्व कारस्थान रचल्याचा आरोप त्यांच्यावर होता. १ नोव्हेंबर १९७६ ते ऑक्टोबर १९७९ अशी जवळजवळ तीन वर्षं ते या खटल्यात अडकले होते. त्यांना कारावासही भोगावा लागला होता. ऑक्टोबरमध्ये त्यांची मुक्तता झाली.

असे हे भिंदर दिल्लीचे पोलीस आयुक्त झाले. त्यांनीही लगेच जाहीर केलं, "कोणालाही मी पूर्वीच्या प्रकरणामुळं सूडबुद्धीनं वागवणार नाही." मात्र लगेच पुस्ती जोडली, 'कार्यक्षमतेच्या आणि परिणामकारी उपाययोजनेच्या दृष्टीनं काही बदल्या मात्र जरूर कराव्या लागतील.'

सूत्र हाती घेताच भिंदरनी तातडीनं पावलं टाकायला सुरुवात केली. पोलिसांतर्फे रोजच्या गुन्ह्यांची माहिती देणारं जे पत्रक वृत्तपत्रांना दिलं जात असे त्याचं स्वरूप बदलून टाकण्याचा निर्णय त्यांनी पहिल्या काही दिवसातच घेतला आणि लगेच तो अमलातही आणला. या निर्णयाच्या परिणामांचा समाचार घेताना Times of India च्या १२ फेब्रुवारीच्या अग्रलेखात म्हटलं आहे, As a result of this change, information on even serious crimes is being withheld and the newspapers fobbed off with figures of arrests, externments and so on. During a four day period in the last week, for instance, the crime bulletins made no mention whatever of a daring dacoity in Badarpur, on unusunl mugging in front of the Maulana Azad Medical College and at least three cases of house breaking in South Delhi, to say nothing is bagsnatching and thets.'

भिंदरनी नुकताच कारभार हाती घेतला आहे. अजून तरी दिल्ली-

तल्या गुन्हेगारीच्या वातावरणात विशेष फरक पडलेला नाही.

भिंदरपाठोपाठ महत्त्वाचा एक बदल लवकरच केला गेला. सी. बी. आय. च्या संचालकपदी जनता सरकारनं नेमलेले आर. डी. सिंग यांना रजेवर पाठवलं गेलं आणि त्यांच्या कारभाराची सूत्रं सी. बी. आय. चे संयुक्त संचालक असलेले पी. एस. बावा यांच्याकडे देण्यात आली आहेत. बावा हे संजय–इंदिरा गटाच्या मर्जीतले मानले जातात; पण अद्याप त्यांची या पदावर नियुक्ती मात्र झालेली नाही.

यापाठोपाठ दिल्लीच्या प्रशासनात आणखी एक महत्त्वाचा बदल सरकारनं केला. जनता सरकारनं दिल्ली केंद्रशासित प्रदेशाच्या नायब राज्यपालपदी नेमलेले डी. आर. कोहली यांना रजेवर पाठवण्यात आलं. कोहली पूर्वी संरक्षणखात्याचे सचीव होते. ते निवृत्त झाल्यावर जनता सरकारनं त्यांना नायब राज्यपालपदी नेमलं. २७ जानेवारीला त्यांनी राजीनामा दिला. आता नव्या सरकारनं १७ फेब्रुवारीला त्यांच्या जागी जगमोहन यांची नेमणूक करून आणीबाणीत गाजलेल्या नि पुढे बदनाम ठरलेल्या आणखी एका अधिकाऱ्याला पुनरागमनाची संधी दिली आहे.

जगमोहन हे काँग्रेस (आय)च्या सल्लागारांपैकी एक मानले जातात. ते संजयच्या जवळचेही समजले जातात. आणीबाणीत ते दिल्ली विकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष होते. त्यांच्या कारकीर्दीतच दिल्लीतलं गाजलेलं तुर्कमान गेट प्रकरण घडलं होतं. तुर्कमान गेट भागातल्या पक्क्या घरांसह अनेक बांधकामं त्या वेळी पाडण्यात आली होती. दिल्ली विकास प्राधिकरणाच्या उपाध्यक्षपदापेक्षा वरचं पद देऊन आता नव्या सरकारनं त्यांना मानाचं स्थान बहाल केलं आहे.

## एक विस्मृत घटना

एकीकडे असं काहींचं पुनरागमन घडत असतानाच काही अधिकाऱ्यांना मात्र वेगळ्या परिस्थितीला तोंड द्यावं लागत आहे, असं एन. के. सिंग प्रकरणावरून जानेवारीच्या अखेरीला दिसून आलं.

सी. बी. आय. मधले उपमहानिरीक्षक आणि 'किस्सा कुर्सी का' प्रकरणातले प्रमुख चौकशीअधिकारी एन. के. सिंग यांना २९ जानेवारीला पहाटे अचानकपणे अटक करण्यात आली. त्यातून एक वादळ निर्माण झालं.

एन. के. सिंग यांनी 'किस्सा कुर्सी का' प्रकरणाचा फार कसून तपास केला होता. संजय गांधी आणि विद्याचरण शुक्ला यांना या प्रकरणाच्या खटल्यात उच्च न्यायालयात शिक्षाही झाली होती आणि त्याविरुद्ध त्यांनी केलेलं अपील सध्या सर्वोच्च न्यायालयापुढे आहे. त्याचा निर्णय लवकरच अपेक्षित आहे.

एन. के. सिंग म्हटलं की, हा सारा इतिहास आठवतो. तसंच आणखीही एक गोष्ट आठवते. 'किस्सा' प्रकरणी ते तपास करीत असतानाच १९७७ मध्ये त्यांना अनेक प्रकारे धमक्या दिल्या जात होत्या आणि १९७७ च्या हिवाळ्यातच त्यांचा मुलगा 'अपघातात' ठार झाला होता. विशेष म्हणजे सी. बी. आय. च्याच एका अधिकाऱ्याची ही गाडी होती आणि सिंग यांच्या मुलाला ठोकर बसल्यावर ती बेपत्ता झाली होती. आता विस्मृतीत जात चाललेली ही घटना आठवली ती सिंगना झालेल्या अटकेच्या प्रकारामुळे.

२९ जानेवारीच्या पहाटे सिंग यांच्या दिल्लीतल्या निवासस्थानी हरियाना पोलिसांच्या दोन जीप्स आल्या. त्यात सशस्त्र पोलीसही होते. पहाटे साडेचारपासून त्यांचा शोध घेत साडेपाचच्या सुमाराला ही मंडळी त्यांच्याकडे येऊन थडकली होती. अटकेचं वॉरंट किंवा अन्य कोणतीही कागदपत्रं त्यांनी आणलेली नव्हती. इतकंच नव्हे तर दिल्लीच्या हद्दीत अशी काही कारवाई करण्यासाठी त्यांनी दिल्ली पोलिसांची परवानगीही घेतली नव्हती आणि त्यांना काही पूर्वकल्पनाही दिली नव्हती.

'किस्सा' प्रकरणात तपास करताना सिंगनी 'मारुती मोटार कंपनी'तला ड्रायव्हर रामचंदर याला सक्तीनं डांबून ठेवलं आणि त्याचा छळ केला, अशा आरोपाच्या संदर्भात सिंगना अटक करण्यासाठी हरियानाचे पोलीस आले होते. ही फिर्याद मात्र ताजी नव्हती, दोन वर्षांपूर्वीची होती.

२६ मे १९७७ ला रामचंदरचा पुतण्या म्हणवणाऱ्या एकानं संजयबरोबर येऊन गुरगाव पोलिसठाण्यावर ही फिर्याद नोंदवली होती; पण पुढं हे प्रकरण फाईल केलं गेलं. नंतर खटला चालला. संजय-शुक्लांना शिक्षा झाली. त्याविरुद्ध त्यांनी अपील केलं आणि एवढं सारं घडल्यानंतर पुन्हा या प्रकरणी जबाबासाठी सिंग हरियाना पोलिसांना हवे होते. सिंगनी तात्काळ पी. एस. बावांना फोन केला; पण 'मी तुम्हाला थोड्या वेळातच फोन करतो', असं बावांनी सांगितलं आणि नंतर प्रत्यक्षात फोन केलाच नाही. दरम्यान कुणी तरी हा प्रकार पत्रकारांना कळवला आणि पत्रकार तिथं येऊन दाखल झाले. त्यामुळं पोलीस अधिकारी संतप्त झाले. त्यांनी सिंगना जीपमध्ये बसवून तत्काळ गुरगावला नेलं. त्यांना असं नेण्यासाठी आवश्यक असलेल्या परवानगीचीही त्यांना गरज वाटली नाही.

एखाद्या प्रकरणातल्या चौकशी अधिकाऱ्याला अशी अटक होण्याचा सी. बी. आय. च्या इतिहासातला हा पहिलाच प्रसंग आहे.

सिंग-अटक प्रकरणाचे पडसाद संसदेत उमटले. विरोधकांनी सरकारला धारेवर धरलं; पण 'सिंगना पकडून नेलं होतं, ती अटक नव्हती', असं काटेकोर तांत्रिक उत्तर देऊन झैलसिंगांनी त्याची फारशी दखल घेतली नाही.

आणि या प्रकरणापासून झैलसिंगांना फार न बोलण्याचा आदेश दिला गेल्याचं वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालं आहे. त्याऐवजी गृहखात्याचे राज्यमंत्री योगेंद्र मकवाना हेच नंतर परिस्थिती हाताळताना दिसायला लागले. आणीबाणीत ब्रह्मानंद रेड्डी गृहमंत्री होते; पण सूत्रं मात्र राज्यमंत्री ओम. मेहता हेच सांभाळत होते. त्याची उगाच आठवण झाली.

एन. के. सिंग यांचा जबाब घेऊन दोन हजार रुपयांच्या वैयक्तिक जामिनावर त्यांना सोडलं गेलं; पण प्रश्न तेवढ्यावरच संपला नाही. हरियानाचे मुख्यमंत्री भजनलाल यांनी गर्जून सांगितलं, 'आवश्यकता भासल्यास सिंगना अटक केली जाईल.'

भजनलालनी ही गर्जना करण्याला एक पार्श्वभूमी होती. ती नंतर थोडी-थोडी बाहेर कळायला लागली. ती अशी होती : सिंगना अटक करावी, असं इंदिरा गांधींना वाटत नव्हतं; पण भजनलाल त्या वेळी पक्षांतर करून काँग्रेस (आय) मध्ये आले होते. संजयसाठी काही-

तरी करायची त्यांची इच्छा होती. २८ जानेवारीला संजय भजनलालना भेटला आणि भजनलालनी त्वरेनं हालचाली सुरू केल्या. झैलसिंगांना या साऱ्याची कल्पना होती. त्यांचा त्याला पाठिंबा होता. आणखीही काही करायचा या मंडळींचा बेत होता; पण आरडाओरडा झाल्यामुळं या मनसुब्यांना आवर घालणं त्यांना भाग पडलं.

सिंगना अटक करण्याचा बेत ठरत असतानाच २८ जानेवारीला बंगलोरला एक धाड पडली होती. युवक काँग्रेसच्या माजी अध्यक्षा, विद्यमान काँग्रेसनेत्या श्रीमती अंबिका सोनी यांचे बंधू राकेश सेन यांच्या बंगलोरमधल्या कारखान्यावर धाड घातली गेली होती. सिंगअटकेत भजनलालांचा पुढाकार होता, तर या धाडीचा आदेश मुख्यमंत्री गुंडू राव यांनी दिला होता. एके काळी संजयच्या निकटवर्ती असलेल्या आणि नंतर त्याच्याशी वितुष्ट आलेल्या अंबिका सोनींचं आणि गुंडू रावांचं युवक काँग्रेसमधलंच वैमनस्य आहे, हे आता नवं नाही. या धाडीचा प्रश्नही विरोधी पक्षांनी उपस्थित केला; पण संजयचं नेतृत्व मानणाऱ्या तरुण खासदारांनी विरोधी सदस्यांना बोलणंही अशक्य केलं होतं. म्हणूनच जनतानेते अटलबिहारी वाजपेयी एका भाषणात म्हणाले होते, 'काही खासदार बोलण्याऐवजी दुसऱ्यांचा आवाज दडपून टाकण्यासाठी लोकसभेत आल्यासारखे वागतात.'

इंदिरा गांधींना असं वर्तन अपेक्षित नसावं. कारण १० जानेवारीला काँग्रेस (आय) पक्षाच्या कार्यकारिणीच्या सभेत इंदिरा गांधींनी कार्यकर्त्यांना सांगितलं होतं, 'हा विजय नम्रतेनं स्वीकारा.'

पण २८ जानेवारीलाच इंदिरा गांधींनी राज्यसभेत विरोधीनेते लालकृष्ण अडवाणी यांच्या एका विधानावर 'नॉन्सेन्स' असा शेरा मारला. विरोधकांनी त्याविरुद्ध आवाज उठवला तेव्हा त्यांनी सांगितलं, 'हा शब्द असंसदीय असेल तर मी तो मागे घ्यायला तयार आहे.'

पण अध्यक्षांना तो शब्द असंसदीय वाटला नाही. हा पराभव नम्रतेनं स्वीकारणं विरोधकांनाच भाग पडलं. हे सारं इथपर्यंत आलेलं असताना सरकारनं आणखीही काही वाटचाल केली होती. आसाममध्ये परदेशी नागरिकांच्या प्रश्नांवर चालू असलेलं आंदोलन थांबवून शांतता प्रस्थापित करण्यासाठी इंदिरा गांधींनी पुढाकार घेऊन विद्यार्थी-नेत्यांशी वाटाघाटी चालवल्या होत्या. त्यांच्या काही मागण्या मान्य करून प्रश्न सोडविण्याच्या दिशेनं पहिलं पाऊल टाकलं होतं. पद्मश्री, पद्मविभूषण वगैरे किताब देण्याची जनता सरकारनं बंद केलेली प्रथा सरकारनं पुन्हा सुरू केली. काळाबाजारवाले, साठेबाज, नफेबाज यांना सरकारनं इशारे दिले. प्रतिबंधात्मक स्थानबद्धता कायदा कायम ठेवायचा निर्णय घेतला. संसदेत आणि विधिमंडळात मागासवर्गीयांसाठी राखीव जागांची मुदत वाढविण्याची तरतूद असलेलं पंचेचाळिसावं घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करून घेतलं. वैद्यलिंगम् आयोगाचा अहवाल स्वीकारला. आकाशवाणी-दूरदर्शनला स्वायत्तता न देण्याचा निर्णय घेतला. 'समाचार' स्थापनेचा विचार सुरू केला. या साऱ्या काळात महागाई वाढत होती. जीवनावश्यक वस्तूंची टंचाई वाढत होती.

विरोधी पक्षांची सरकारं असलेल्या राज्यांमधल्या काँग्रेस (आय) कार्यकर्त्यांना आणि प्रामुख्यानं युवक काँग्रेस (आय) कार्यकर्त्यांना यातून एकच मार्ग दिसत होता. बिगर काँग्रेस (आय) सरकारं असलेल्या राज्यांच्या विधानसभा विसर्जित करून निवडणुका घेणं. त्यांनी जोरदारपणानं तशी मागणी सुरू केली. राज्याराज्यांमध्ये त्यासाठी विधिमंडळांपुढे, प्रसंगी हिंसकही निदर्शनं व्हायला लागली. त्यातून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न अधिक बिकट व्हायला लागल्याच्या तक्रारी राज्यांचे मुख्यमंत्री करायला लागले होते. बिगर काँग्रेस (आय) सरकारं भवितव्याच्या चिंतेत सापडली होती.

इंदिरा गांधी सांगत होत्या, 'विरोधी पक्षांच्या घटनात्मक सरकारांना आम्ही धक्का लावणार नाही. विधानसभा-विसर्जनाचा आमचा विचार नाही.'

संजय विधानसभा-विसर्जनाची मागणी करीत होता. एकदा तर तो चुकून बोलून गेला, 'पंधरा तारखेला उत्तर प्रदेशची विधानसभा विसर्जित होईल. पुढे पुस्ती जोडली, 'असं मी वर्तमानपत्रात वाचलं आहे.'

## नारायणपूर प्रकरण

उत्तर प्रदेशच्या विधानसभेवर संजयचा विशेष रोख होता. या रोखातूनच नारायणपूर-प्रकरण रंगलं होतं. '१४ जानेवारीला उत्तर प्रदेशातल्या नारायणपूर या खेड्यात पोलिसांच्या एका तुकडीनं लूटमार केली, पुरुषांना मारहाण केली नि स्त्रिया-मुलींवर अत्याचार केले.' अशी बातमी होती. जनता पक्षासह सर्वच पक्षांनी विधानसभेत या प्रकाराबाबत चिंता व्यक्त करून चौकशीची मागणी केली होती. मुख्यमंत्री बनारसीदास यांनी चौकशीचा आदेशही दिला होता.

उत्तर प्रदेशचे खासदार झालेल्या संजयचं या प्रकरणाकडे लक्ष गेलं. त्यानं लगेच नारायणपूरला भेट दिली. 'परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी' केल्यावर त्यानं सांगितलं, 'नारायणपूरच्या प्रत्येक पुरुषाला मारहाण झाली आहे आणि प्रत्येक स्त्रीवर बलात्कार झाला आहे. योग्य पद्धतीनं या प्रकाराची चौकशी चाललेली नाही. बनारसीदास सरकारला सत्तेवर राहण्याचा नैतिक हक्क या प्रकरणामुळे उरलेला नाही!' चौकशीसाठी नियुक्त केलेल्या न्यायाधिशांवरही संजयनं टीकास्त्र सोडलं.

बनारसीदासांनी इंदिरा गांधींना एक सविस्तर पत्र लिहून वस्तुस्थितीची कल्पना दिली. 'संजयला संयमानं वागायला सांगा!' अशी विनंती या पत्रात केली. इंदिरा गांधींना हे पत्र आणि ही विनंती आवडली नाही. आपल्याला लिहिलेल्या अधिकृत पत्रात केलेल्या संजयच्या उल्लेखाला त्यांनी हरकत घेतली आणि 'गुन्हेगारांना कडक शिक्षा करा!' असं बनारसीदासांना सुनावलं. स्वतः नारायणपूरला भेट देण्याची घोषणाही त्यांनी केली. 'हा राज्याच्या कक्षेतला विषय आहे, पंतप्रधानांनी तिथे भेट देणं योग्य नाही,' असं बनारसीदास म्हणाले; पण पंतप्रधानांना अशी बंधनं घालणं अनेकांना पसंत नव्हतं. इंदिरा गांधी भेट देऊन आल्या. संजयपेक्षा फार वेगळा सूर त्यांनी काढला नाही.

संजय बनारसीदासांवर रोज टीकास्त्र सोडायला लागला.

विधानसभाविसर्जनासाठी निदर्शनाचं नेतृत्व त्यानं केलं. संसदेच्या सेंट्रल हॉलमध्ये शालधारी संजयच्या चरणांना वंदन करून आशीर्वाद घेण्यासाठी गर्दी दिसते. तिथे त्यांच्या निदर्शनांमध्ये

सहभागी होण्यासाठी छोटे-मोठे नेते, कार्यकर्ते गर्दी न करतील तरच नवल.

विधानसभा–विसर्जनाची मागणी वाढत गेली. याच वेळी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या आभारदर्शक ठरावाला राज्यसभेत दोन दुरुस्त्या स्वीकारण्याचा प्रसंग सरकारवर आला. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभारदर्शक ठरावाला दुरुस्त्या स्वीकाराव्या लागण्याचा स्वातंत्र्योत्तर कालातला हा पहिलाच प्रसंग आहे. राज्यसभेतलं हे विरोधकांचं प्राबल्य काँग्रेस (आय)ला मानवण्यासारखं नाही. राज्यसभेच्या द्वैवार्षिक निवडणुका ऐन तोंडावर आल्या होत्या. एप्रिलमध्ये चौसष्ट जणांची मुदत संपते आणि बारा रिकाम्या जागांची निवडणूक तेव्हा आहे. आपले कार्यक्रम राबविण्यासाठी राज्यसभेत आपलं बहुमत असलं पाहिजे हे काँग्रेस (आय)चे नेते बोलून दाखवू लागले. त्यासाठी विधानसभांमध्ये आपलं बहुमत असणं आवश्यक आहे, हा त्यांच्या म्हणण्याचा आशय होता.

पण झैलसिंग मात्र सांगत होते, 'विधानसभा–विसर्जनावर सरकारनं अजून विचारच केलेला नाही.' पुढे पुढे ते म्हणायला लागले, 'लोकमताचा आमच्यावर दबाव वाढतो आहे; पण आम्ही अजून विचार केलेला नाही.'

तेच इंदिरा गांधी म्हणत होत्या.

तेच योगेंद्र मकवाना सांगत होते.

'ग्रहणाच्या मुहूर्तावर सरकार बिगरकाँग्रेस (आय) राज्यसरकार बरखास्त करून विधानसभा विसर्जित करणार!' अशी बातमी प्रसिद्ध झाली. झैलसिंगांनी तिचाही इन्कार केला.

ग्रहण होऊन गेलं.

दुसऱ्या दिवसही उलटला.

आणि १७ फेब्रुवारी उजाडला आहे. दिवसभर कसलीच हालचाल कळलेली नाही. राज्यसरकारं आपापल्या अंदाजपत्रकी अधिवेशनाच्या विचारात गुंतली आहेत. 'पुरोगामी कार्यक्रमात केंद्राला राज्यांनी सहकार्य न दिल्यास गंभीर विचार करावा लागेल,' हे इशारे मान्य करूनच सर्व जण तयारीला लागले आहेत. रात्रीचे नऊ वाजून गेले आहेत. एकेक बातम्या येत येत बिगरकाँग्रेस (आय) सरकारं असलेल्या नऊ राज्यांच्या विधानसभा घटनेच्या ३५६ व्या कलमानुसार विसर्जित करून मंत्रिमंडळं बरखास्त करून राष्ट्रपती-राजवट लागू करण्यात आली आहे. उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्य प्रदेश, ओरिसा, महाराष्ट्र, पंजाब, गुजरात आणि तामिळनाडू या नऊ राज्यांचा त्यात समावेश आहे. प्रश्न पडतो हरियाना आणि हिमाचल प्रदेश याना का नाही? आणि लगेच लक्षात येतं. पक्षांतरांनी ही सरकारं आता जनमताचं प्रतिनिधित्व करणारी झाली आहेत.

बाकीच्यांना नव्यानं जनतेचा कौल अजमावावा लागणार आहे.

साडेअकरा वाजून गेले आहेत आणि राष्ट्रपती नीलम संजीव रेड्डी यांनी वटहुकुमांचे कागदपत्र 'हाती येताच' स्वाक्षरी केल्याची बातमी धडधडते आहे.

सत्तांतर घडवून आणण्यास कारणीभूत ठरणाऱ्या या राष्ट्रपतींच्या आणि जनता पक्षानं एप्रिल १९७७ मध्ये नऊ राज्यविधानसभा विसर्जित केल्या तेव्हा स्पष्टीकरणासाठी एक दिवस घेणारे तेव्हाचे हंगामी राष्ट्रपती बी. डी. जत्ती यांच्या कारभाराच्या आठवणी जमा होत आहेत.

आणि इंदिरा गांधींचं आश्वासन कानात घुमतं आहे. 'आम्ही कोणताही निर्णय सूडबुद्धीनं घेणार नाही...!'

□

## साप्ताहिक माणूस

### मालकी व तत्संबंधित इतर तपशिलाचे निवेदन

( अधिनियम ४, नियम ८ अन्वये )

| | | |
|---|---|---|
| १. प्रकाशन स्थळ | : | पुणे |
| २. प्रकाशन काल | : | साप्ताहिक |
| ३. मुद्रक, प्रकाशक, संपादक नाव व पत्ता | : | श्री. ग. माजगावकर, १०२५ सदाशिव पुणे ३०. |
| ४. नागरिकत्व | : | भारतीय |
| ५. प्रकाशन संस्थेचे नाव व तिच्या मालकांचे नाव व पत्ता | : | राजहंस प्रकाशन श्री. ग. माजगावकर १०२५ सदाशिव पेठ पुणे ३० |

वर दिलेला तपशील बरोबर आहे.

प्रकाशकाची सही

दिनांक : १ मार्च १९८० श्री. ग. माजगावकर